TIGHT BINDING BOOK

UNIVERSAL
LIBRARY
OU_192578
UNIVERSAL
LIBRARY

OUP—552—7-7-66—10,000

**OSMANIA UNIVERSITY LIBRARY**

Call No. M83 A31S Accession No. M 31

Author [illegible]

Title सीमा

This book should be returned on or before the date last marked below.

# सीमा

लेखिका

शशिकला आळंदकर

प्रकाशक

महाराष्ट्र ग्रंथ भांडार, मुंबई नं. ४

प्रकाशक—
शंकर वामन कुलकर्णी,
महाराष्ट्र ग्रंथ भांडार
मुंबई नं. ४

[ सर्व हक्क लेखिकेच्या स्वाधीन ]

प्रथमावृत्ति नोव्हेंबर १९४३.

किंमत २ रुपये

मुद्रक—
रघुनाथ दिपाजी देसाई,
न्यू भारत प्रिंटिंग प्रेस,
६ केळेवाडी, गिरगांव मुंबई नं. ४

मातृचरणा—

# १

मंगल गात होती. दूर उभं राहून सुरेन् तिच्याकडे एकाग्रतेनं पहात होता. मंगलला मात्र त्याची दादही नव्हती. उलट गात असतांना ती मनांत म्हणत होती—अजून कसें नाहीं आले सुरेन् ?

आणि सुरेन् ऐवजीं तिची मीना धांवतच आंत आली—उभ्या असलेल्या सुरेन्‌कडे तिनें पाहिलं—नाकावर बोट ठेवून स्वतःच्या अस्तित्वाची खबर न देण्याबद्दल सुरेन्‌नें तिला सूचना दिली. आणि नवल म्हणजे आज मीनीनं झटपट् मान हालवून त्याच्या सूचनेचा स्वीकार केला. आणि लगेच ती आक्काच्या गळयांत पडली—

" अग, अग जरा हळू. तंबोरा फुटला असता कीं—"

" हुं फुट्टूं दे जा—आक्का—आक्का—ए आक्का—"

" अग मी बहिरी नाहीं. आंधळी आहे. "

मंगल हंसून म्हणाली. मीना पण हसूं लागली.

" आक्का—आक्का एक फार मोठी आनंदाची बातमी सांगण्यासाठीं धांवत आलें मी—" एखादी बातमी झटपट् सांगेल तर ती मीना कसली ?

" आक्का ओळख ना—हं चल, आटप लवकर. "

" इत्तेच्या एवढंच ना. मीना नांवाच्या एका मुलीचा धांवण्याच्या शैर्यतींत पहिला नंबर आला. "

" अं हं. नाहींच मुळीं. "

" मग ! " तिच्या आक्कानं क्षणमात्र विचार केला—

" हो खरंच. आमच्या मीनीच्या मनी मांजरीला आज सुरेखशीं पिलं—"

" आक्का—" मिनीनं गाल फुगवले.

" अजून कसली ग बातमी आणली आहेस आज ? "

" सांगितल्यावर काय देशील ? "

" देईन चार—फार तर सहा श्रीखंडाच्या वड्या—"

हा करार मीनाला मनांतून मुळींच पसंत नव्हता. पण आतां तिला जास्त वेळ दम धरवेना—

" आक्का, परवां ते अमेरिकेहून डॉक्टर आले आहेत ना ? त्यांच्याकडे बाप्पा गेले होते—आक्का, त्यांनीं तुझे डोळे बरं करण्याचं वचन दिलं बाप्पांना—"

" खरं—खरं—"

" खरं—अगदीं अगदीं खरं आक्का—परवांच्या दिवशींच ऑपरेशन—"

मंगलनं मीनाला जवळ ओढलं. तिच्या दृष्टीहीन नेत्रांत आशेचे किरण चमकूं लागले. मीनानं सुरेन्‌कडे पाहिलं—कसा अगदीं आनंदानें फुलून गेला होता त्याचा चेहेरा—कांहीं तरी बोलण्यासाठीं त्यानें ओठ उघडले—आणि मीनाच्या वटारलेल्या डोळयाकडे पाहून पुन्हां मिटले.

आतां आणखी काय आलं होतं त्या खटयाळ पोरीच्या मनांत ?

आक्काच्या गळयांत पडून तिनें लाडिकपणें विचारलं—

" आमची आक्का आतां काय काय पहाणार. सांग ना ग आक्का. "

" काय पहाणार ? ह्या गोड, खठ्याळ मीनीला पहाणार—बाप्पांना पहाणार—काकांना पहाणार सारं सारं जग पहाणार. "

पण छे ! मीनीला हें थोडंच पटणार होतं ! तिला हवं होतं दुसरंच कांहींतरी.

" खोटं—अगदीं खोटं. आमच्या आक्कानं हें सारं सारं पाहिलं आहे—आक्काला अजून कांहींतरी पहायचं आहे—सांग ना ग आक्का—काय आहे तें ? "

" चल वात्रट कुठली ! "

लाजेनं आक्का कशी लाल लाल झाली आणि आक्काला लाजलेली पाहून

तिच्या मीनीला जास्तच चेव आला. एकाद्या लहान मुलीप्रमाणें मीनी शब्दाला शब्द जोडून गाऊं लागली. मीनीचंच गाणं तें—त्याला कसला ताळ तंत्र ? पण नाहीं. ताळतंत्र नसला तरी त्यांत कांहीं तरी अर्थ होता खास.

मीनी म्हणत होती—

माझ्या बागेंत रोज कशीं छान छान फुलं फुलतात. माझ्या घरावर रोज ढग येतात अन् जातात. रात्रीं आकाशात लुकलुकणाऱ्या त्या इवल्याशा तारका—पण माझ्या आक्कानं हें सारं कांहीं एकेकाळीं पाहिलं आहे. पण तिनं पाहिलं नाहीं फक्त एकच आणि तेंच पहाण्यासाठीं माझी आक्का इतकी आतूर झाली आहे. काय आहे असं तें ? सांगू ?—

पण छे ! सरळपणें मीनीनं आजपर्यंत एक तरी गोष्ट सांगितली होती का ?

मीनीनं आतां मार्ग थोडासा बदलला. ती एकदम गंभीर झाली. कसा अगदीं छान आव आणला होता गंभीरपणाचा !

" आक्का, तुला एक प्रश्न विचारूं ? "

भोळी, भाबडी आक्का. तिला वाटलं एवढा कसला गहन प्रश्न विचारणार आहे मीना. ती पण गंभीर झाली. आणि मीनानं विचारलं—

" आक्का, तूं एकदां म्हणाली होतीस कीं मी माझ्या—हं म्हणजे तुझ्या बरं का—सुरेन्द्रना रोज पहातें—त्यांना पहाण्यासाठीं दृष्टीची गरजच नाहीं—"

किंचित हंसून मंगल मध्येंच म्हणाली—

" मग ? खरं तेच सांगितलं होतं मी तुला. "

" पण आक्का, आधळ्या माणसाला तर कांहींच नाहीं दिसत. मग तूं कशी पहातेस सुरेन्द्रना ? "

मीनीच्या ह्या मिस्कील प्रश्नाला तिची आक्का अगदीं शांतपणें उत्तरं देत होती—

" मीना तें तुला कसं सांगूं ? ह्या गोष्टी सांगून समजणार नाहींत. त्यासाठीं माझ्यासारखं आधळंच झालं पाहिजे. "

आपल्या आक्काचा पुरता पाठलाग करण्याचा जणूं मीनीनं आज निश्चयच केला होता.

" आक्का तूं सुरेन्द्रना पाहिलं आहेस ना ? खरं ना ? मग सांग पाहूं तुझे

सुरेन् काळे आहेत कीं गोरे गोरे-पान आहेत ते? ताडासारखे उंच आहेत कीं आपल्या बागेतल्या त्या बदामाच्या झाडासारखे ठेंगणे आहेत? त्यांचे डोळे हत्तीसारखे आहेत कीं—"

" मीना!" तिच्या आक्कानं मिनीच्या धावत्या गाडीला मध्येंच खीळ घातली.

" मीनी, काळं—गोरं, उंच ठेंगणं हे कांहीं मला कळत नाहीं. मला फक्त एकच माहीत आहे. जगांतली सुंदरता म्हणजेच माझे सु..."

मीना खो खो हंसत सुटली आणि हसता हसतांच तिनं विचारलं—

" इतके सुंदर आहेत तुझे सुरेन्? खात्री आहे तुझी?" मंगलनं कांहींच उत्तर दिलं नाहीं—तें देण्याची गरजच नव्हती.

" आक्का, डॉक्टरनीं तुझ्या डोळयावरचा पट्टा काढला कीं तूं नक्की बेशुद्ध पडणार—तुझ्या सुरेन्सारखा कुरूप—"

" अशक्य—अशक्य आहे तें मीनी. माझी प्रेममूर्ती आणि कुरुपता? वेडी!! साऱ्या जगांतली सुदरता, मंगलता म्हणजेच माझे सुरेन्!"

मंगल आवेशानें बोलत होती. खस्याळ मीनी मोठमोठ्यानें हंसत होती. आणि सुरेन्? होय. तोही हंसण्याचा निष्फळ प्रयत्न करीत होता. आणि तेवढ्यांत जर बाप्पा जगूकाकासह तिथें आले नसते तर अजूनहि छळलं असतं त्या पोरीनं त्या दोघांना. मीनीचेच बाप्पा ते! आनंदातिशयानें त्यांच्या मुखांतून शब्द उमटत नव्हते. आपल्या लाडक्या मंगलच्या केंसावरून ते हळूवारपणें हात फिरवूं लागले. आणि जगूकाकांनीं एका दमात सुरेन्ला सांगून टाकलं—" बरं का सुरेन्, आमच्या मंगलला आतां दृष्टी येणार—परवां ऑपरेशन—"

मंगल एकदम दचकून म्हणाली " कोण सुरेन्! ते इथेंच आहेत?"

" कशी झाली गंमत, कसं फसवलं एका माणसाला"—मीनी, बाप्पा, जगूकाका, मंगल, सारं घर, सारं जग आनंदानें नाचत होतं. आणि सुरेन्? त्यालाही खूप खूप आनंद झाला होता. पण—पण त्याच्या वर्मी बसलेला तो घाव, तें रक्तबंबाळ हृदय आणि त्याच्या त्या प्राणांतिक वेदना—आत्यंतिक आनंद आणि आत्यंतिक दुःख दोहोंचा अनुभव तो एकाच वेळीं अनुभवित होता. कां?

# २

मीना, बाप्पा आणि जगूकाका हॉस्पिटलच्या दालनांत ऑपरेशन रूमच्या बाहेर उभे होते. एरव्हीं सतत अवखळ वाऱ्याप्रमाणें भिरभिरणारी मीनी आज कशी अगदीं गुपचुप उभी होती. प्रत्येकाची नजर त्या ऑपरेशन रूमच्या दरवाजावर खिळली होती—जणूं तें दारच आज त्याच्या लाडक्या मंगलचं भवितव्य सागणार होतं. हळुहळूं दरवाजा उघडला गेला. डॉक्टराच्या चेहऱ्यावरचा तो अपूर्व यशाचा आनंद—

बाप्पांनीं तर डॉक्टरना मिठीच मारली. जगूकाकांनीं उपरण्याच्या टोकानं डोळे टिपले. मीनानं स्वत:भोवतींच एक गिरकी घेतली आणि मग लगेच ती आनंदाची बातमी साऱ्या जगाला सागण्यासाठीं ती बाहेर धांवली.

थोड्या अंतरावर उभं राहून सुरेन्‌ही सारं काहीं पहात होता. ऐकत होता. कोणाचंच त्याच्याकडे लक्ष नव्हतं. मीना—किती अगदीं जवळून गेली ती. पण नुसतं पाहिलं सुद्धा नाहीं तिनं त्याच्याकडं. जाणारा प्रत्येक क्षण—प्रत्येक लहान सहान घटना त्याला जणूं सुचवित होत्या—

" सुरेन्, आता तुझं इथं काहीं काम नाहीं. तुझी गरज संपली ! "

माणसाचं मन म्हणजेच जगांतला त्याचा सर्वांत मोठा शत्रु आहे म्हणतात तें काहीं खोटं नसाव. नाहींपेक्षां सुरेन्‌ला तसं वाटण्याचं काय कारण होतं ?

आंत त्याची मंगल आपल्या श्वासाबरोबर म्हणत होती—' सुरेन्—माझे सुरेन् ! '

कसं कोणास ठाऊक पण डॉक्टराचं लक्ष गेलं त्याच्याकडे. ते पुढें झाले. सुरेन्च्या पाठीवर हात ठेवला—

" आतां फक्त एकच दिवस कीं मग चोवीस तास एकमेकांना पहात रहा. शुद्धीवर येतांच प्रथम तुमचंच नांव घेतलं मंगलानं...नशीबवान् आहांत सुरेन्..."—अनेक रोगांवर अचूक उपचार करणारे डॉक्टर कांहीं तरी बडबडत होते. सुरेन् अगदीं शांत होता. नाहीं म्हणायला फक्त एकच निःश्वास त्यानें टाकला...काय होता अर्थ त्याचा ? छे ! ह्या अशा धावपळीच्या जगांत सुरेन्सारख्या एका क्षुल्लक माणसाच्या एका निश्वासाचा विचार करायला सवड होती कोणाला ? जड पाउलानं सुरेन् घराकडे जात होता. केवढा आनंदाचा दिवस आजचा ! पण—पण—

आनंद आणि दुःख—आशा आणि निराशा यांतलं अंतरच जणूं सुरेन्ला कळेनासं झालं होतं. माणूस झोपेंत चालावा तसाच तो चालत होता......
......जगांतील सारीं घड्याळें चालूं होतीं. काळ सारखा धांवत होता. वारा वहात होता. मध्यरात्र झाली तरी जागच असलेल्या सुरेन्ला वाटूं लागलं—

काळाला कधींच झोप येत नाहीं का ? मोकाट सुटलेल्या सैतानाप्रमाणें हा सारखा धावतो आहे. काय मिळवायचं आहे त्याला असं धावून ?

आणि इकडे मंगलही जागी होती. घड्याळाचा प्रत्येक ठोका ती कान देऊन ऐकत होती. अवघे सहा तास आणि मग तिचा सुरेन् तिला दिसणार होता. डोळ्यावरचं तें आवरण दूर होणार होतं. घड्याळांत पुढें जाणारा कांटा क्षणाक्षणानें तिच्या मनावरचं दडपण दूर करीत जात होता.

सुरेन्हि घड्याळाचे ठोके ऐकत होता. क्षणाक्षणाला कसलं तरी दडपण पडून त्याचं मन जड होत होतं.

काळ कधीं कोणासाठीं थांबला आहे ? दिवस उजाडला.

'सुरेन्, सुरेन्' सुरेन्ला पहाण्यासाठीं उत्सुक झालेली मंगल—प्रत्येक क्षण तिला युगाप्रमाणें वाटत होता. आणि घराबाहेर पडतांना सुरेन् स्वतःशींच म्हणत होता—' किती लवकर संपली रात्र ! '

डॉक्टरांच्या बुटांचा तो ओळखीचा आवाज हळुहळूं जवळ आला. हळुवार हातानें मंगलच्या डोळ्यावरचं आवरण दूर केलं.

सुंदर काळ्याभोर डोळ्यानीं तिनें सभोवार पाहिलं—तिच्याकडे सारा जीव

डोळ्यांत आणून पाहणारे बाप्पा, जगूकाका, हंसरी मीना, सारं कौशल्य खर्ची घालून तिची दृष्टि परत आणणारे डॉक्टर, सारं सारं तिच्या नजरे समोरून जात होतं. पण तिची दृष्टि कुठेच स्थिरावली नाहीं.

तिला जें हवं होतं—नेमकं तेंच तिथं नव्हतं. तिनें डोळे मिटले. अंधारांतून उजेडांत आल्यावर चांगल्या नजरेला सुद्धां प्रकाश सहन होत नाहीं. मंगल तर आतां एका तपानंतर प्रकाश पहात होती. तो प्रकाश सहन न होऊनंच तिने डोळे मिटले होते का ?

तिच्या ओठांतून अस्पष्ट शब्द बाहेर पडले—" सुरेन् कु-ठें आहेत ? "

प्रत्येकानं आपल्या सभोंवार पाहिलं. कुठें होता सुरेन् ? आश्चर्याची छटा प्रत्येकाच्या मुखावर उमटून गेली. दुसऱ्याच क्षणीं मीनाची मोटार सुरेन्ला आणण्यासाठीं फाटकाच्या बाहेर पडली.

मीनीनं सारं घर शोधलं. पण सुरेन् तेथें नव्हता. त्या घरांतल्या कांहीं निर्जीव वस्तू, कांहीं क्षणांपूर्वी येथें एका माणसाची वस्ती होती एवढंच सुचवीत होत्या.

निराश मनानं मीना परतली. पाउलांच्या आवाजाबरोबर केवढ्या उत्सुकतेनें तिच्या आक्कानं डोळे उघडले ! काय नव्हतं त्या दृष्टींत ? मीना—एकटी मीना. तिच्या आक्कानं डोळे मिटून घेतले.

माणसाला खोटं बोलायला शिकवावं लागत नाहीं हेंच खरं.

" आक्का, सुरेन् कांहीं जरूरीच्या कामासाठीं—कालच त्यांच्या मावशीकडून निरोप आला—ती फार आजारी आहे. तिला पहाण्यासाठीं सुरेन् कालच गेले. दोन दिवसांनीं परत येणार आहेत. "

आयुष्यांत आज प्रथमच मीना खोटं—आणि तेंहि इतकं सफाईदार खोटं बोलत होती.

मंगल कांहींच बोलली नाहीं. तिच्या मिटलेल्या डोळ्यांतून फक्त दोनच अश्रू उशीवर पडले. पण कोणाच्याच तें लक्षांत आले नाहींत.

जगांत जमिनीपेक्षां पाणीच जास्त आहे. पण तें तरी कुठं माणसाच्या लवकर लक्षांत येतं ? कुणीतरी तें सांगावं लागतं. पटवून द्यावं लागतं.

ते दोन अश्रू तिथेंच पडले—तिथेंच सुकले. त्याचा मागमूसहि मागें राहिला नाहीं.

रक्ताचा डाग पडतो. पण अश्रूचा डाग—तो कधींच कोणाला दिसत नाहीं.

# ३

धांवत्या गाडींतून सुरेन् दूर दूर जात होता. बऱ्याच दूरच्या प्रवासाला निघालेल्या एका प्रवाशानं त्याला गाडींत चढतांना विचारलं होतं—" कुठं निघालां आहांत ? "

कांहींतरी उत्तर द्यायचं म्हणूनच सुरेन्नं उत्तर दिलं—" जवळच ! "

स्टेशनामागून स्टेशनं जात होतीं. गाडी थाबत होती. कांहीं उतारू आपल्या मुक्कामाच्या ठिकाणीं उतरत होते. तर कांहीं प्रवासी गाडींत चढत होते.

रोजच्या जगांतली ती आरडाओरड, आपापली जागा मिळविण्यासाठीं चाललेली धडपड तडफड—त्यांतच उद्भवणारीं तीं भांडणं सारं कांहीं तिथंहि व्यवस्थित चालू होतं.

त्याचं मात्र कुठेंच लक्ष नव्हतं. व्यवहारी जगापासून तो जणूं अगदीं अलिप्त होता.

गाडींत चढल्यापासून तो बाहेर पहात होता. त्याच्याच समोरच्या बांकावर बसलेल्या त्या छोट्या मुलाचीं चुळबूळ सारखी चालूं होतीं. बाहेरचं धांवतं जग, धांवणारे पर्वत, झाडं त्याला पहायची होती. आणि खिडकी-जवळच्या जागा तर मोठ्या माणसानीं आधींच पटकावल्या होत्या. शेवटीं त्या मुलांनीं धीर धरून सुरेन्ला हळूच विचारलं—

" जरा तुमच्या जागेवर मला बसूं देतां ? थोडा वेळ—अगदीं थोडा वेळ—"

सुरेनूनं त्याच्याकडे पाहिलं सुद्धा नाहीं. त्याच्या शेजारीं बसलेल्या म्हाताऱ्यानं हात कानाला लावून मूठ झाकून अन् आंगठा हलवून मनांतला संशय व्यक्त केला—' बहिरा असावा—' आणि आजूबाजूच्या लोकांनाहि तें पटलं असावं. हो ! नाहीं तरी प्रवासांत इतका थंड बसणारा माणूस अंधळा तरी असला पाहिजे नाहींतर बहिरा तरी असला पाहिजे.

सतत ऐशीं वर्षं जगाचा रंग पाहूनहि जगाचा खरा रंग ओळखतां न आलेल्या त्या म्हाताऱ्या बाबाजवळ शेवटीं तो मुलगा गेला.

" आजोबा, मला जरा खिडकीजवळ—"

म्हातारे बाबा मध्येंच खेकसले—" चल चालता हो. म्हणे बाहेर पाह्यचंय. आहे काय बाहेर तुझ्या बापाचं डबोलं ? लहान मुलांनीं कसलं बसायचं खिडकीजवळ—चल जा बैस तिकडे पलिकडे. "

बिचारं पोर ! त्याला अजून कळायचं होतं—पटायचं होतं कीं म्हातारे आजोबा आपल्या हातांतली काठी सुखासमाधानानें नातवाच्या हातांत देतीलच असा भरवसा नाहीं. कधीं ती घेण्यासाठीं नातवाला रडावं लागतं—भांडावं लागतं—वेळप्रसंगीं आजोबाशीं दोन हात सुद्धां करावे लागतात.

लांबच्या गांवाला निघालेल्या त्या प्रवाशाचं पण गांव आलं. खालीं उतरतां उतरतां तो मागें वळून पहात होता. ' जवळच्या ' प्रवासाला निघालेला तो प्रवासी अजूनहि पुढें जातांना पाहून त्याला जरा चमत्कारीक वाटलं असावं.

" चक्रम ' दिसतोय झालं ! " जरासं तोंड वाकडं करून तो प्रवासी निघून गेला.

तारवटलेल्या नजरेनं सुरेन् अजूनहि बाहेरच पहात होता. आणि नागपूर स्टेशनवर तो नवा प्रवासी गाडींत चढला नसता तर ती त्याची तंद्री अजूनही कायम राहिली असती.

" बाबा, जगांत असतं एक आणि जगाला दिसतं भलतंच—"

आणि या एकाच वाक्यानें सुरेनूची तंद्री उतरली त्यानें बाहेरची नजर आंत वळविली.

हें बोलणाऱ्या माणसाचा धक्का दुसऱ्या एका माणसाला लागला होता. व्यवहारी जगांत रोज अनेक धक्के खाणाऱ्या त्या सद्ग्रहस्थाला तो लहानसा धक्का सहन झाला नाहीं.

" काय रे ए मूर्खा, दिसत नाहीं का तुला ! डोळे फुटले आहेत ! "

आणि ह्यावर तो धक्का देणारा माणूस म्हणत होता—" बाबारे डोळेच नाहींत मग ते फुटणार कुठून ! "

आणि या बोलण्यानं तर त्या ग्रहस्थाच्या रागाचा पारा जास्तच वर चढला—

" अरे वा ! चांगल्या माणसासारखे डोळे दिसताहेत तुझे—आणि डोळे नाहींत काय ? लुच्चा, लबाड, ढोंगी लेकाचा. "

आणि त्यावर पूर्वींच्याच शांत सौम्य आवाजांत त्या माणसानं दिलेलं उत्तर—" बाबा, जगांत असतं एक आणि दिसतं भलतंच—" आणि ह्याच शब्दानं सुरेन् शुद्धीवर आला होता. धक्का देणारा तो माणूस वेड्या-सारखा बडबडत होता—

" बाबारे, डोळे उघडे असूनहि जगांतलं सत्य पाहूं न शकणाऱ्या माण-साचं प्रतीक म्हणून देवानं आम्हांला जन्माला घातलं..."

त्या वेडयाची बडबड लोकांना कळली कीं नाहीं कोणास ठाऊक पण ती दुसऱ्या एका वेड्याला मात्र कळली असावी. सुरेन् चटकन् उठला आणि वरून डोळस दिसणाऱ्या त्या अंध तरुणाचा हात धरून स्वत:जवळ बसवलं.

अचूक स्पर्शज्ञान असलेल्या त्या अंधाला सुरेन्चा तो प्रेमळ स्पर्श— त्यांतली आपुलकी जाणवल्यावांचून कशी राहील ?

" कुठें निघालांत आपण ? "

" जवळच ! " पुन्हा सुरेनन् तेंच उत्तर दिलं.

" कोठून आलांत ? "—अंध तरुणानें लगेच दुसरा प्रश्न विचारला.

कोठून आलां ? कुठें निघालां ? किती साधे सरळ प्रश्न पण आज त्याचीं उत्तरं सुरेन्ला सुचत नव्हतीं.

गाडीच्या आवाजात प्रश्न ऐकूं गेला नसेल अशा समजुतीनें त्या अंधानं पुन्हा तोच प्रश्न मोठ्यानें विचारला. आतां उत्तर देणं भागच होतं. हो नाहींतर दुसऱ्या डब्यांत ऐकूं जाईल एवढ्या मोठ्यानें त्यानें तोच प्रश्न तिसऱ्यांदा विचारला तर ? " मुंबईहून " त्यानें चटकन् सांगितलं.

" बाप रे ! बराच दूरचा प्रवास आहे कीं तुमचा आतां ' जवळ ' आलं आहे वाटतं उतरण्याचं ठिकाण ! "

" हुं "—सुरेन्‌नें अर्थ नसलेला हुंकार दिला.

कांहीं काळ दोघेहि स्तब्ध राहिले. पण त्या तरुणाला ती शांतता मानवली नसावी. हो, कधीं काळीं बाहेरच्या जगांतलीं माणसं भेटणार आणि त्यावेळीं पण ही असली मुग्धता—त्याला तें पटलं नसावं. तो बोलूं लागला,—

" दोन दिवस झाले, आजारी मावशीला भेटण्यासाठीं म्हणून आलों होतों.—आज परत निघालों. "

कसल्या तरी अपेक्षेनें तो तरुण क्षणभर थांबला, पण सुरेन् स्तब्धच राहिला.

आणि मग मात्र त्यानें सुरेन्‌च्या प्रश्नाची आशाच सोडली. न विचारतांच सारं सांगण्याचा त्यानें मनांत निश्चय केला.

" गोंदियाजवळ आंधळयांचा आश्रम आहे ना—"

जणूं कांहीं त्याचा तो छोटासा आश्रम ताजमहालसारखा जगप्रसिद्धच होता !

" त्याच आश्रमांत—"

" कुठच्या आश्रमांत म्हणालांत ? "

" गोंदियाजवळ आंधळयांचा आश्रम आहे ना—तेथेंच असतों मी—सारा जन्म तेथेंच गेला. तेथेंच वेतकाम शिकलों. आतां दुसऱ्यांना शिकवितों. "

" सगळीं मुलं आंधळींच आहेत का तिथं ? " किती अर्थरहित प्रश्न विचारला होता सुरेन्‌नं !

" अहो, आंधळयांचाच आश्रम म्हटल्यावर तिथं कशाला येतील डोळस मुलं ? साराच आंधळयांचा कारभार ! हो,—नाहीं म्हणायला माझ्यासारखे जगाला फसविणारे दोन चार आंधळे आहेत तिथ. "

तो अंध तरुण हंसूं लागला. सुरेन्‌नंहि हंसण्याचा प्रयत्न केला.

" तुमच्या आश्रमांत आंधळया मुलांना शिकवायला बरेच शिक्षक असतील ? "

" छे हो, तसं असतं तर काय कमी होतं ? आंधळया मुलांचं जग-त्यांतून शहराबाहेर एका बाजूला, जवळ मुबलक पैसा नाहीं, अशा स्थितींत कोण येणार तिथं शिकवायला ? नाना गुरुजी—तो देवमाणूस—सारखा झिजत असतो आश्रमासाठीं. म्हणूनच आजपर्यंत जीव धरून आहे तो. "

" मध्येंच चमकून सुरेननं विचारलं,—" कोण,—कोण म्हणालांत ? "

" नाना गुरुजी—नुसता देव माणूस आहे. त्यांनींच तो आश्रम स्थापन केला. सारा जन्म त्या आश्रमासाठीं—"

" काय हो,—तुम्हांला मग शिक्षकांची बरीच गरज असेल ? "

इतका वेळ काय सांगत होता तर मग तो अंध तरुण ? अजून सुरेन् पूर्णपणें शुद्धीवर आला नव्हता हेंच खरं.

" होय बाबा, खूप खूप गरज आहे शिक्षकांची, पण येणार कोण ? परवांच पहा ना,—आश्रमांत गाणं शिकविणारा शिक्षक कांहीं कामासाठीं म्हणून मुंबईला गेला तो परत आलाच नाहीं. कुठल्याशा फिल्म कंपनींत—"

अघळपघळ गप्पा मारण्याचा आणि ऐकण्याचा सुरेन्‌ला कंटाळा असावा. नाहीं तरी त्याचं स्वतःचं आयुष्यसुद्धां किती आटोपशीर होतं !

" मग आतां कोण शिकवतो गाणं तुमच्या आश्रमांत ? "

" गुरुजी शोधांत आहेत, पण अजून कोणी मिळत नाहीं.—" आणि क्षणभर थांबून त्या तरुणानें विचारलं,—" तुमच्या आहे का हो पहाण्यांत असा कोणी माणूस—"

" अं अंऽ, कसला माणूस म्हणालांत ? "

काय म्हणावं ह्या सुरेन्‌ला आतां ? भ्रमिष्टपणाचा कळस झाला होता.

" नाहीं, म्हटलं आमच्या आश्रमांत मुलाना गाणं शिकवायला एकादा मनुष्य—"

" हो आहे कीं. "

" कोण,—कोण आहे ? कुठं आहे ? पण तो येईल ? "

अधीरपणानं तो मनुष्य भराभर प्रश्न विचारीत होता. पण त्याला उत्तर मात्र तेवढ्या तांतडीनं मिळालं नाहीं. कसला तरी विचार सुरेन्‌च्या डोक्यांत आला असावा, पण दुसऱ्या क्षणीं त्याला स्वतःलाच वाटत असावं—छे ! विचार करण्यात अर्थ नाहीं. आणि विचार करण्याइतकी विचारशक्ति तरी कुठें उरली आहे शिल्लक ? आणि मग झटपट त्यानें त्या तरुणाला विचारलं,—

" पण काय हो, मला ठेवतील का तुमच्या आश्रमांत गायनमास्तर म्हणून ? "

" तुम्ही,—तुम्हाला—पण—पण—गातां येतं—"

बोलतांना तो तरुण कचरत होता. व्यवहारी जगांतलं एक घाव घालून दोन तुकडे करण्याचें सामर्थ्य त्या तरुणांत अजून आलं नव्हतं.

आणि सुरेन्नं तें सारं ओळखलं असावं.

" मला साधारण गातां येतं. मुंबईस मी बऱ्याच लोकांना गाणं..." बोलतांबोलतांच तो थांबला. बरेच लोक कुठले हे ? फक्त एक मंगल —मग असं खोटं—छे ! खोटं कसलं ? मंगल म्हणजेच त्याचं जग. ' सबंध जगाला ' नाहीं म्हणाला तो हेंच नशीब ! तो अंध तरुण म्हणत होता,—

" मुंबईच्या लोकांना गाणं शिकवीत होतां तर मग नक्कीच उत्तम गायक असणार आपण !—पण—पगाराचं कसं जमणार ? "

" कशाचं कसं जमणार ? " भ्रमिष्ट सुरेन् !

" आपला पगार तो आम्हांला देतां आला पाहिजे ना ! "

" बिनपगारी माणसं घ्यायचीं नाहींत असा तुमच्या आश्रमाचा नियम असेल तर मात्र तुमचंआमचं नाहीं जमायचं—" सुरेन् हंसूं लागला. खूप खूप दिवसांत इतकं मोकळेपणानें हंसल्याचं त्याला आठवत नव्हतं. त्याचा हात हळूच दाबून तो अंध तरुण कांहीं न बोलतांच मनांतली कृतज्ञता व्यक्त करीत होता,—

" केवढे उपकार आहेत हे तुमचे !—"

पण कुणी कुणावर उपकार केले होते ? एका आंधळयानं एका डोळस माणसाला मार्ग दाखविला होता. आणि किती अचूक होता तो मार्ग !

आंधळयानं दाखविलेला मार्गच अचूक असतो. कां ? कारण त्याला दुसरे मार्ग माहित नसतात म्हणून तर नसेल ना ?

# ४

पूराबरोबर वहात येणारीं दोन लाकडं एकत्र येतात, एकमेकांवर आपटतात आणि पूर ओसरतांच एकमेकांपासून दूर होतात. पहाणाऱ्याला त्यांत कांहींच विशेष वाटत नाहीं. पण निसर्गाची ही नाजूक, सूक्ष्म पण तितकींच चिवट बंधनं जगाला कळलीं असतीं तर त्यांत निसर्गाचं वैशिष्ट्य तें काय राहिलं असतं ?

हंसरी, नाचरी मीना गात होती—नाचत होती—हंसत होती मुळचीच आनंदी मीना जास्तच आनंदी दिसत होती. जणूं सौख्याचं शिखरच तिच्या हातीं आलं होतं. तिच्या आक्काची दृष्टि परत आली हेंच कारण होतं ना त्या आनंदाला ? किंवा दुसरंच कांहीं तरी...? कोणास ठाऊक !

मूळचेच समाधानी वृत्तीचे बाप्पा आतां जास्तच समाधानी, शांत दिसत होते. पूर्वी त्यांच्या समाधानात एकच कमतरता होती. पण तीहि मंगलचे डोळे परत देऊन देवानं दूर केली.

आणि जगूकाकांना तर स्वतःचं असं सुखदुःखच उरलं नव्हतं. वीस वर्षांपूर्वी दोन वर्षांचं गोजिरवाणं बाळ मागें ठेवून त्यांची पत्नी देवाघरीं निघून गेली. आणि त्यानंतर अवघ्या दोन वर्षांनीच आईच्या भेटीला बाळही निघून गेला. तेव्हांपासून आपला मित्र माधव आणि त्यांच्या दोन मुली यांच्या ठिकाणीं जगूकाकांनीं आपली माया-ममता गुंतवून टाकली. पहिल्यापासून मंगलवर त्यांचा भारी जीव. त्या तिच्या दृष्टीहीन मुखाकडे

पाहून त्यांचे डोळे भरून येत असत—आणि आतां तरी काय ! मंगलला पाहिलं कीं ते उपरण्याच्या टोकांनीं अश्रू चटकन् टिपून घेत—पण आतांचे ते अश्रू—आनंदाश्रू होते ते.

मंगलच्या बागेंत फुलांना बहर आला होता. तिचा लाडका किशोर 'मंगल-मंगल' म्हणून गात होता. तिची मीनी तिच्याभोंवती सतत नाचत होती. तिच्या बाप्पांचा हात तिच्या मस्तकावरून फिरत होता. तिचे जगूकाका नित्य नियमानें तिच्यासाठीं कांहीं ना कांहीं तरी सुंदर वस्तु आणित होते—

राधा मोलकरीण न चुकतां आणि मंगलच्या रागास भीक न घालतां मीठ मोहऱ्यांनीं रोज आपल्या आक्काच्या पाणीदार डोळयांची दृष्ट काढतांना अनेकांच्या डोळयांत माती टाकीत होती !

प्रत्येकजण मंगलला हंसविण्याचा—फुलविण्याचा प्रयत्न करीत होता. पण—

सुकलेलं फूल पाण्यांत ठेवलं नव्हे अगदीं अश्रूंनीं भिजविलं तरी तें थोडंच फुलणार आहे ? उलट तें कुजूं लागतं मात्र !

मंगल वर वर पहातां शांत—अगदीं शांत दिसत होती. वरून थंड भासणाऱ्या राखेच्या ढिगाखालींच कधीं कधीं निखारे असतात. दारुण निराशा, हृदयाची तळमळ दिवसेन् दिवस वाढतच होती. मनाचं दुःख आंतल्या आंत दाबून टाकण्याचा ती प्रयत्न करीत होती. आणि म्हणूनच दुःखाचं-निराशेचं आवरण दिवसेन् दिवस अधिकच दाट होत चाललं होतं.

दृष्टी परत आल्यापासून तर ती स्वतःला गातां येतं हेंच विसरली होती. ऑपरेशन झालं आणि त्या दिवसांनंतर तिचं स्वतःशीं गुणगुणणंहि कुणी नव्हतं ऐकलं.

नाहीं म्हणायला कधीं कधीं ती आपल्या आवडत्या ऑर्गनजवळ जावून बसे—हळुवारपणें त्यावरून बोटं फिरवी. पण त्यांतून सूर निघत नसत. त्या ऑर्गनकडे पहात ती तासन् तास बसून राही. त्या उघडया डोळयापुढें स्वप्नं दिसूं लागत. गत काळांतल्या त्या जागृत आयुष्यांत घडलेल्या घटना आतां तिला स्वप्नासारख्या वाटत होत्या. स्वप्नसृष्टींतल्या अशक्य घटना खऱ्या ठरूं पहात होत्या—आणि अजून थोडयाच दिवसांनीं स्वप्नसृष्टी आणि जागृती यांतला भेदच मुळीं नाहींसा होणार होता.

ह्याच ऑर्गनवर सुरेनूचीं बोटं फिरूं लागलीं कीं अगदीं सहजच मंगलच्या गळ्यांतून शब्द बाहेर पडूं लागत–अगदीं देहभान विसरून ती गाऊं लागे–

देहभान विसरून नाचणाऱ्या मोराचं स्वतःच्या पायांकडे लक्ष जातांच त्याचा नाच एकदम थांबावा—

कधीं कधीं असंच कांहींसं होई. गातांगातांच कसल्यातरी दुःखद जाणीवेनं ती एकदम स्तब्ध होई—तिच्या मुखावर खिन्नता स्पष्ट दिसूं लागे. तिच्या दृष्टिहीन नेत्रांत असाह्यतेचे अश्रू—पण हें सारं क्षणमात्रच. तिचा सुरेन् लगेच पुढें होई. तिचा हात हातांत घेई. भाषेची गरजच भासली नव्हती त्या दोघांना कधीं. तो त्याचा स्पर्श—

" असं काय बरं मंगल, आंधळेपणा म्हणजेच खऱ्या प्रेमाचं लक्षण ! कशाला हवी आहे ती दृष्टी ? जग पहायलाच ना ? मग माझे डोळे ते तुझेच नाहींत का ? माझ्या डोळ्यानं जगाकडे—हं हं वेडी कुठली ! हास ना..."

आणि मग मंगल लगेच हंसूं लागे. पण आतां ? दृष्टी परत येऊनहि तिला हंसतां येत नव्हतं. मानवी उत्क्रांती होतांना—एकादी गोष्ट मिळवायला दुसरं कांहीं तरी द्यावं लागतं म्हणे—

मंगलची दृष्टि परत आली. पण तो आनंद—तें हास्य पार लयाला गेलं !

सर्वांनाच कळत होतं—कांहीं तरी चुकत आहे—कसली तरी कमतरता आहे तिच्या आयुष्यांत. आणि हें सारं कळत असूनही त्यावर उपाय मात्र कुणालाच सुचत नव्हता.

अजूनहि बाप्पा, जगूकाका मीना—कोणालाच कळत नव्हतं—सुरेनूनं असं कां केलं ? दोघांचंहि परस्परांवर इतकं प्रेम—सुरेनूनं एक कोडंच घातलं होतं त्या सर्वांना.

" कशाला—कशाला त्या सुरेनूला ठेवला माझ्या मंगलला गाणं शिकवायला—जातांना माझ्या घराला आग लावून गेला. मीच मूर्ख."

आणि बाप्पा स्वतःलाच दोष देवून असा त्रागा करून घेऊं लागले म्हणजे मग जगूकाका त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न करीत.—

" अरे वेड्या, जें व्हायचं होतं तेंच झालं. होणाऱ्या गोष्टी का कधीं टळतात ? "

आणि मग बाप्पा कपाळाला हात लावून स्वस्थ बसत.

एक दिवस बाप्पा असेच कपाळाला हात आणि आकाशाकडे दृष्टि लावून बसले होते. जगूकाका खोलींत आल्याची चाहूल त्यांना लागली नसावी. शेवटीं त्या शांततेचा जगूकाकांनीं भंग केला—

" एवढा कसला विचार करतो आहेस ? "

आकाशाकडे लागलेली दृष्टी काढून न घेतांच बाप्पा उद्गारले—

" दुसरा कसला विचार करणार ? "

कांहीं क्षण कोणीच कोणाशीं बोललं नाहीं.

" तें पाहिलंस ? "

बाप्पांनीं जगूकाकाकडे पाहिलं. जगूकाका आकाशाकडे पहात होते—

" माधव, आयुष्य म्हणजे पौर्णिमेचं चांदणं नव्हे. त्यांत संकटं हीं यायचींच. त्यांतूनच कांहींतरी मार्ग काढला पाहिजे—प्रयत्न केला पाहिजे. "

" तूं पहातो आहेस जगदीश, काय करायचं राहिलं आहे शिल्लक ? सुरेन्‌चा तर पत्ता लागत नाहीं—मंगल दिवसेन्‌ दिवस खंगत चालली आहे—काय करूं तें तरी साग ? "

जगूकाकांनीं तरी थोडा का विचार केला होता त्यावर—पण त्यांना तरी कुठें त्यांतून बाहेर पडण्याचा मार्ग सांपडला होता. कांहींतरी बोलायचं म्हणून जगूकाका म्हणत होते—

" अजून थोडे दिवस थांब. काळासारखं औषध नाहीं दुःखावर. अजून थोड्या दिवसांनीं सारं कांहीं व्यवस्थित होईल. "

पण त्या तत्त्वांतला फोलपणा दोघांनाही पटला होता. थोडा का काळ लोटला होता ?

पण उगवणारा प्रत्येक दिवस मंगलेच्या निराशेंत भर घालूनच मावळत होता. दिवसेन्‌ दिवस ती जास्तच उदास दिसत होती. तो तिचा कोमेजलेला चेहरा—ती डोळ्यासभोंवतालचीं काळीं वर्तूळं—

आणि तरिही जगूकाका बाप्पांना काळापोटीं दडलेल्या विस्मृतीरुपी अमृतावर—त्या मृगजळावर विश्वास ठेवायला सांगत होते. नाहीं तरी काय करणार ? मार्गच मिळत नसला म्हणजे अशाच तऱ्हेनं स्वतःच्याच मनाला फसवावं लागतं माणसाला.

कालचक्र चालूंच होतं. दिवसा मागून दिवस जात होते.

मीनी हंसत होती, गात होती—स्वतःलाच जग समजून स्वतःभोंवतींच गिरक्या घेत होती.

बाप्पा, जगूकाका मावळणारा प्रत्येक दिवस मोजीत होते—स्वतःचीच फसवणूक करून घेत होते.

आणि मंगल ? ती अगदीं शांत शांत होती.

# ५

आंत बाहेर चोहोंकडे अंधार. त्या अंधारांत आपला मार्ग शोधून काढून त्या मार्गानें जाणाऱ्या आणि शेवटीं त्या अंधारांतच विलीन होणाऱ्या अनेक जीवांबरोबर तोहि जगत होता.

त्याच्या त्या निर्विकार चेहेऱ्यावर गत आयुष्यांतल्या त्या घटनेचा ठसा उमटलेला दिसत नव्हता—तसाच भावी आयुष्यातल्या आशेचाही तेथें मागमूस नव्हता.

नाना गुरुजी—आश्रमाचे चालक त्या होतकरू स्वार्थत्यागी तरुणांकडे कौतुकानें पहात. क्वचित प्रसंगीं त्याच्या पाठीवर हात ठेवून न बोलतांच मनांतली भावना व्यक्त केल्यावांचून त्यांना रहावत नसे.

तिथल्या आंधळ्या मुलांमुलींना तर त्याचा विराग भय्या—होय त्याच नांवानें सुरेन् त्या जगांत ओळखला जात होता—म्हणजे दैवतच वाटे.

त्याचा तो प्रेमळ, शात स्वभाव, दुसऱ्या जीवाना सदोदीत धीर देणारी ती मधुर वाणी —लहानापासून मोठ्यापर्यंत सर्वांना वाटे—विराग भय्या—आपला—माझा—माझा एकट्याचाच आहे.

त्याला स्वतःचीं कांहीं सुख-दुखं असतील ही कल्पनाही कधीं कोणाला आली नाहीं. त्यानें येऊं दिली नाहीं.

दिसणं आणि असणं यांतला तो जमीन अस्मानचा फरक जगाला आपण स्वतः दाखवावा लागतो. तो शोधून काढायला जगाला फुरसद नसते आणि कारणहि नसतं.

रोज सूर्योदयाबरोबर उठावं. त्याच जुन्या जगाकडे नव्या दृष्टीनं पहावं—तेच ते जुने वृक्ष, तीच ती कधींही न वाढणारीं झुडपं, तींच रोज उमलणारी आणि नित्य सुकणारीं फुलं, झाडाखालीं रोज पडणारा तो पाचोळा—सगळीकडे नजर टाकावी आणि मग जगण्यांत आनंद आहे उमलतं फूल पहाण्यात आनंद आहे—पाचोळा पहाण्यांतहि विकास आहे. हें एंकच तत्व मनाला शिकवण्याचा प्रयत्न करावा. आश्रमाच्या आवारांत साताच्या ठोक्याबरोबर घंटेचा धीर गंभीर आवाज होतांच मुलांमुलींची सामुदायिक प्रार्थना घेण्यासाठीं जड पण तेवढीच निश्चयी पावलं टाकीत निघून जावं.

सकाळीं उठल्यापासून रात्रीं झोपेपर्यंत त्याचे सारे व्यवहार ठरलेले असत. त्यांत नाविन्य नव्हतं. जुनेपणाचा कंटाळाही नव्हता.

त्याला वाटत होतं—

घडून गेलेल्या साऱ्या घटना भूतकाळाच्या उदरांत पार नाहींशा झाल्या आहेत—त्यांचा आतां मागमूसही शिल्लक राहिला नाहीं. हुरहुर, आशा, आकांक्षा, दुःख निराशा सारं—सारं कांहीं संपलं आहे—वेडा विराग भय्या ! स्वतःच्याच मनाची फसवणूक करीत होता.

आणि त्या दिवशीं सुलोचनेनें त्याला जाग आणली नसती तर अजूनही कित्येक दिवस तो स्वतःला असाच फसवीत राहिला असता.

बकुलीच्या झाडाखालीं विचारमग्न बसलेल्या सुलोचनेला विराग भय्यानीं पुढें जातां जातां सहजच विचारलं—

" काय लोचन, कसला एवढा विचार करते आहेस ? "

" विचार ? आंधळ्यांना विचार करण्याची गरज नसते विरागभय्या. आंधळ्याचा मार्ग ठरलेला असतो. मग कसला विचार करायचा ? "

—प्रश्नाचं उत्तर न देतां सुलोचनेनं त्याला उलट प्रश्न विचारला.

" तेंच तर विचारतों आहे मीं—"

" त्याला विचार म्हणत नाहींत. विरागभय्या—" मध्येंच क्षणभर सुलोचना थांबली. आणि कांहीं तरी गमतीचं उत्तर ऐकायला मिळेल ह्या अपेक्षेनं विरागभय्या पण उभा राहिला.

" त्याला विचार म्हणत नाहींत विरागभय्या, त्याला म्हणतात 'मनोराज्य' !"

" मनोराज्य ! " विरागनं हंसून विचारलं—

" वा ! राज्याचं नांव तर सुरेख आहे बुवा. त्या मनोराज्यांत राजा कोण होता ? राणी कोण होती ? प्रधान कोण होता ? राजाला मुलं किती होतीं ? सांग ना लोचन त्या मनोराज्याची गोष्ट—"

सुलोचना कांहींच बोलली नाहीं. आणि पुन्हा विरागनें तोच प्रश्न विचारला—

" हं सांग ना तुझं तें मनोराज्य—मला बघ कधीं मनोराज्यच रचतां येत नाहीं—"

" तुम्हांला त्याची गरजच नाहीं विरागभय्या. बाह्यसृष्टी पाहूं न शकणाऱ्या माझ्यासारख्या आधळ्या जीवांना स्वतःचीच सृष्टी निर्माण करून त्यांतच रमून जायला शिकावं लागतं; डोळस माणसांला—"

सुलोचना अशीच कितीतरी वेळ बोलत राहिली असती. आणि अजून कितीतरी कामं आटपायचीं होतीं विरागला. त्यानें पाऊल उचललं—पायाखालचा पाचोळा सळसळला.

" हें काय निघालांत विरागभय्या ? माझं मनोराज्य न ऐकतांच ? "

" छे. छे ! भलतंच. तें तुझं मनोराज्य ऐकल्यावांचून मी कसा जाईन ? हं सांग पाहूं झट्कन्. "

" बरं का विराग, अमेरिकेहून—"

" अमेरिका—" विराग अकारण दचकला.

" हो अमेरिका. अमेरिकेहून ते एक डॉक्टर आले—आहेत ना हिंदुस्थानांत ?—त्यांनीं कितीतरी आंधळ्यांना डोळस केलं—"

विरागनें श्वास कोंडून धरला.

" हें काय विरागभय्या तुम्ही ऐकत आहांत ना ! "

" हो—हो तर. सांग ना पुढें—" विरागनें स्वतःच्या अस्तित्वाची तिला खात्री पटवून दिली. सुलोचना पुढं सांगूं लागली—

" अशीच एक दिवस मी रस्त्याच्या कडेनं चाललें होतें. इतक्यांत मागून एक मोटार भरधांव धांवत आली आणि तिचा धक्का मला लागून मी जोरानें आपटलें—माझ्या डोक्याला—"

" च्! च्!! "

" पुढें त्या डॉक्टरनें—हो ! तोच तो अमेरिकेहून आलेला डॉक्टर बरं का—मला दवाखान्यांत नेलं. माझी दया येऊन त्या डॉक्टरानं माझ्या डोळ्यांचं ऑपरेशन करायचं ठरवलं—" आणि मध्येंच विरागनें उत्सुकतेनं विचारलं—

" ऑपरेशन केलं त्या डॉक्टरनीं तुझ्या डोळ्याचं ?"

" हो तर."

" आणि तरीहि तुझी दृष्टी परत आली नाहीं ?" कसल्या तरी आशेनं—भयंकर विचारानं विरागचे डोळे चमकले.

सुलोचना हंसूं लागली.

" अहो विरागभय्या ? हें माझं मनोराज्य—"

" अं—अं खरंच कीं. मनोराज्य नव्हे का—" विरागनें स्वतःला सावरण्याचा प्रयत्न केला. आणि पुढें जातां जातां मागें वळून त्यानं कांहीं तरी विचारायचं म्हणून विचारलं—

" आणि समज लोचन, तुझी दृष्टी परत आली तर तूं काय करशील ? स्वतःच्याच डोळ्याकडे पहात तासन् तास बसून रहाशील झालं."

" छट् ! मुळींच नाहीं." प्रत्येक शब्दांवर जोर देऊन सुलोचना तें नाकारीत होती.

" मग काय करणार तूं ?"

" सांगू ?" क्षणमात्र ती गोंधळली. लगेच स्वतःला सावरलं. आणि मग ती अगदीं शांतपणें सांगूं लागली—

" मी माझ्या विरागभय्याला चोवीस तास पहात राहीन. खरंच विराग, किती प्रेमळ आहांत तुम्हीं. तुमचा तो गोड गोड आवाज—तुमच्या त्या शांत, सौम्य, सुंदर मुखाकडे पहात तासन् तास......" सुलोचना बोलतच होती. मोठ्या कष्टानें एकेक पाऊल उचलीत तो पुढें जात होता.

साऱ्या गोष्टी कशा अगदीं सहजच घडून आल्या. नाहीं तरी जगांतल्या साऱ्या गोष्टी इतक्याच सहजतेनं घडतात कीं.

त्याला वाटत होतं—निखाऱ्याचा पार कोळसा झाला आहे. पण आज त्याला कळून चुकलं—

तो निखारा अजूनही धगधगतो आहे. फक्त त्यावर थोडीशी राख सांचली होती. आणि आज नुसत्या एका फुंकरानं ती राख पार उडून गेली.

मनुष्य कुठेंही गेला, त्यानें कितीही प्रयत्न केला—तरी भूतकाळांत घडलेल्या घटना, त्या घटनांच्या स्मृती, घालवून देण्यास मनुष्य असमर्थ आहे. तें त्याच्या शक्ती बाहेरचं आहे. त्या आठवणी विसरून जाण्याचा प्रयत्न करण्यापेक्षां—त्याला काय वाटलं कोणास ठाऊक ! पण त्या रात्रीं विराग तें गाणं—त्याचं—त्याच्या मंगलेचं आवडतं गाणं—गात होता. गाणं संपलं. मनावरचं मोठं दडपण दूर झाल्याचा त्याला भास झाला. कसल्या तरी समाधानानें त्यानें डोळे मिटले. मिटलेल्या डोळ्यापुढें दिसणाऱ्या मंगलच्या मूर्तीला तो सांगत होता—

" तुला विसरण्याचा प्रयत्न करणार नाहीं ह्यापुढें. तुझ्या स्मृतीत मी माझं आयुष्य वेचणार—मंगल, मंगल—किती दूर आहेस ग तूं ? "

आणि त्या नंतर तें गीत म्हटल्याखेरीज तो कधींच झोपला नाहीं.

# ६

एक—दोन—तीन—चार—घड्याळानें सहा ठोके दिले. मंगल स्वतः-शींच पुटपुटली—

" अजून कशी नाहीं आली मीना आज ? " आणि त्याचवेळीं किशोर ओरडला—" मीना—मीना " मंगलनें बाहेर पाहिलं—मीना आपल्या एका आवडत्या मैत्रीणीच्या बरोबर बंगल्याच्या पायऱ्या चढत होती.

" मीना आज इतका उशीरसा झाला ? "

" अवघ्या आठ दिवसांवर आला आहे थियेटरमध्यें होणारा कार्यक्रम. खूप जोरांत तयारी चालली आहे आक्का आमची. "

" हो—आणि बरं का आक्का—" मीनीकडे पाहून डोळे मिचकावीत कांहीं तरी सांगू पहाणाऱ्या आपल्या मैत्रीणीला मीनीनं इतक्या जोरानं चिमटा काढला कीं तिचं तोंड एकदम् बंद झालं.

मीनी उगीचच इकडेतिकडे फिरत होती—स्वतःशीच गुणगुणत होती—नेहमीचीच तिची ती तऱ्हा.

सहजच मंगलची नजर मीनीनं पुस्तकावर ठेवलेल्या मनीबॅगवर गेली.

" काय पोर आहे ! एवढं भरलं आहे तरी काय या पर्समध्यें—पेरू, बोरं, चिंचा कीं आवळे ? " आणि सहजच मंगलनं पर्स उचलली.

" आक्का—आक्का—" केवढ्यांदा किंचाळली मीनी ! तिच्या आक्काच्या हातांतून पर्स खालीं पडली—उघडली गेली. आंतला छोटासा कॅमेरा बाहेर

पडला. मीनीची मैत्रीण हसूं लागली. आका हसूं लागली. आणि मीनी चांगलीच ओशाळली.

" काय ग कॉलेजमध्यें जातेस तें शिकायला कीं मुलांचे फोटो काढायला ?"

" मुलांचे ? मुलांचे कशाला चांगले प्रो......" पण मिनी थोडंच तिच्या मैत्रीणीला बोलूं देणार ? मिनीच्या आकाला कांहीं तरी सांगण्याचा मैत्रीण प्रयत्न करीत होती. आणि मिनी तिला बोलूं देत नव्हती. शेवटीं मिनीनं तिला बाहेर ओढलं — दोघीही बागेंत धावूं लागल्या.

खिडकींतून मंगला बागेंत गिरक्या घेणाऱ्या त्या दोन फुलपांखराकडे कितीतरी वेळ पहात होती.

" माझी मिनी ! हाच आनंद राहील ना कायम—की माझ्यासारखं तिच्याही आयुष्याचं भवितव्य..." किती वेडं असतं माणसाचं मन ! नाहीं त्या शंका कुशंका काढून, काल्पनिक दु:खाचा—

संध्याकाळचा गार वारा वाहूं लागला. पाखरं घरट्याकडे परतलीं. मिनीच्या मैत्रिणीनं तिचा निरोप घेतला.

वाऱ्यानं उडणाऱ्या पुस्तकांच्या पानाचा तो फडफडाट—मीनीचीं पुस्तकं नीट ठेवण्यासाठीं मंगलनीं उचललीं आणि तेवढ्यांत मीनीनं धांवत येऊन त्यावर झडप घातली.

झालंय काय आज ह्या मीनीला ?

वाऱ्यामुळें आधींच उघडलेल्या गेलेल्या पुस्तकाच्या कव्हरमधून सात आठ छाया चित्रं जमिनीवर विखुरलीं गेलीं.

अंगांतली सारी चपळता खर्ची घालून मीनानं सारे फोटो क्षणार्धांत गोळा केले. एकहि छायाचित्र आकाच्या हातीं लागू दिलं नाहीं.

" पाहूं, कुणाचे फोटो आहेत ते—" मंगलनें हात पुढें केला.

सबंध आयुष्यात मिनानं एकहि गोष्ट आपल्या आकापासून लपवून ठेवली नव्हती. आणि होतं तरी काय त्या अवखळ पोरीच्या आयुष्यांत चोरून ठेवण्यासारखं.

पण आज—मिनी गोंधळली लाजली आणि आकाच्या हातांत फोटो देण्याऐवजीं स्वतःच जाऊन पडली आपल्या आकाला तिनें अगदीं घट्ट घट्ट मिठी मारली. लाजेनं लाल झालेला चेहेरा आकाच्या कुशींत लपवला.

मंगलला कसलाच उमज पडेना. पण हळूहळू तिच्या डोक्यांत प्रकाश पडूं लागला— तिच्या मुखावर हास्य खेळूं लागलं--

मंगलला हें सारं परिचित होतं. एके काळीं ती पण लाजेनं अशीच फुलत होती.

" लबाड ! इतके दिवस चोरून ठेवलस माझ्यापासून ? चोर कुठली ! "

आक्का मिनीचं तोंड वर करण्याचा प्रयत्न करीत होती आणि मिनी तें जास्तच लपवीत होती.

" पाहुं दे तर खरा माझ्या मिनीचा रत्नाकर—" पण मिनीनें ते फोटो हृदयाजवळ घट्ट घट्ट धरून ठेवले.

" असं काय बरं मिनी. तुझ्या आक्काला नाहीं दाखविणार ? "

मिनीनं हळूच वर पाहिलं. तिचे डोळे म्हणत होते—" तुझ्यापासून कांहीं लपवून ठेवणं शक्य तरी आहे का आक्का ? "

" मग पाहूं दे माझ्या मिनीचं कोंदण—"

" अंह आज नाहीं. "

" मग केव्हां ? "

" केव्हां तरी—आक्का—आक्का बघ हं मला चिडवायच नाहीं — काकांना बाप्पाना सांगायचं नाहीं —"

" अग हो पण जरा नीट तरी बैस . "

मिनी दूर झाली. धावत जाऊन हातांतले फोटो सुरक्षित जागीं ठेवले आणि पुन्हां ती धांवतच बाहेर आली.

मंगल मिनीकडे पहात होती. तिला प्रेमाचं स्वरूप ठाऊक होतं. त्या अननुभूत भावनेचा तिनें स्वतः अनुभव घेतला होता. तिची लाडकी मिनी आज त्या फुलांनीं फुललेल्या प्रदेशांतून जात होती. काय नव्हतं त्या प्रेम लोकांत ? प्रेम—प्रेम—आनंद—उन्माद—!

" आक्का, माझं एक ऐकशील ? "

" काय ? "

" अं हं आधीं कबूल कर—"

" अग पण सांग तर खरं आधीं काय तें—"

" नाहीं—नाहीं. आधीं ' हो ' म्हण. "

आज मिनीची एकही इच्छा अपुरी ठेवणं शक्य होतं का तिच्या आक्काला ?

"हो—हो—हो सांग आता—काय हवं ? श्रीखंडाच्या वड्या कीं बाप्पाना चोरून पेरू—"

मिनी हसूं लागली.

"आक्का तूं आज गाणं म्हटलं पाहिजे. अं हं—तें कांहीं नाहीं आक्का—म्हण—म्हण ना ? तें तेंच म्हण 'हासे नाचे चंचल बाला'—"

आणि लगेच मंगलच्या गोड आवाजानं सारा दिवाणखाना भरून गेला. साऱ्या सृष्टींत जणूं नवचैतन्य आलं.

मंगल गात होती—मिनी नाचत होती. पिंजऱ्यांतला पोपट—मंगलचा लाडका किशोर—त्यानें एकदां मान वाकडी केली—गाणं नीट ऐकलं आणि लगेच पिंजऱ्यांत त्याचाही नाच सुरूं झाला.

घरांतलीं सारीं गडी माणसं हातांतलं काम टाकून धावून आलीं. आज कित्येक दिवसांनीं ते त्यांच्या आक्काचा नागाला डोलवणारा आवाज ऐकत होते, मध्येंच धावत जावून राधानं घरांतले सारे दिवे लावले.

पहाणाऱ्याला वाटलं असतं—कुठल्या पंचांगाप्रमाणं आज दिवाळी आहे या लोकांची ?

मंगल गात होती—सूर उंच उंच चढूं लागले—देहभान विसरून मीना नाचूं लागली.

दाराच्या चौकटीवर हात ठेऊन उभ्या असलेल्या बाप्पाना सारंच स्वप्नवत् वाटत होतं. बाहेरून येणारे जगूकाका फाटकांतच थबकले.

"कोणाचा आवाज हा ?"

अगदीं हळू—पाऊलांचा आवाज न करतां ते आंत आले. आतां त्यांची खात्री पटली—त्यांचीं मंगलच गात होती—तो आवाज त्यांच्या मंगलचाच होता.

"बाप्पा जगूकाका दोघांनींही एकमेकांकडे पाहिलं. जगूकाकांनी मान हलविली. बाप्पा अर्थपूर्ण हंसले—

"खरंच कीं रे—आपोआपच सारं कांहीं ठीक झालं !" गाणं थांबलं. नाचहि थांबला.

"बाप्पा, काका—" बाप्पाकडे धावत जात मीनी म्हणत होती.—

" बाप्पा, ऐकलंत का—आठ दिवसांनीं आमच्या कॉलेजचा थिएटरमध्यें कार्यक्रम होणार आहे ना—त्यावेळीं आक्का गाणार—मी नाचणार—"

" नाहीं ना—" पण मंगलला नकार द्यायला सवडच कुठें देत होती मीनी ?—

ती मोठमोठ्यानें सांगत होती—

" बाप्पा—काका—आक्का गाणार—मी नाचणार—"

" मी नाचणार—मी नाचणार—" त्याच शब्दांचा दोनदां प्रतिध्वनि निघाला.

सर्वांचंच लक्ष पिंजऱ्याकडे गेलं.

सगळेच हसूं लागले.

आणि सर्वांनीं हंसून केलेल्या कौतुकानें शेफारून जाऊनच कीं काय किशोर पुन्हां पुन्हां सांगूं लागला—

" मी नाचणार—मी नाचणार—"

# ७

दुष्काळानें त्रस्त झालेल्या लोकाच्या मदतीसाठीं कॉलेजच्या मुलांमुलींनीं केलेल्या प्रयोगाला लोकांनीं चांगलीच मदत केली. सारं थियेटर चिक्कार भरलं होतं.

'ज्या भारत देशांत एकेकाळीं ' सोन्याचा धूर ' निघत होता त्याच भारत देशांत भाकरीच्या चतकोर तुकड्यासाठीं माणसं माणसांचा खून करायला तयार झालीं होतीं. अन्नाच्या अभावीं हजारों लोक मृत्युमुखीं पडत होते. लहान अर्भकं भूकेनं व्याकूळ होऊन तडफडत होतीं—भारत देशांत जन्मलेल्या आर्यकन्या मूठभर धान्यासाठीं पोटच्या गोळयाला विकायला तयार झाल्या होत्या.—

आणि हीं सारीं दृश्यं कॉलेजच्या मुलांमुलींनीं स्टेजवर करून दाखविलीं, आणि तीं अत्यंत परिणामकारक वठलीं.

प्रेक्षकाच्या डोळयांत अश्रू उभे राहिले. हातांत गळयांत मोत्यांच्या माळा घातलेल्या रमणींच्या डोळयांतूनहि टपोरे मोती ओघळूं लागले.

मधून मधून हिंडणाऱ्या स्वयंसेविकेच्या ' दुष्काळ निवारण फंडा 'च्या पेटींत पैसे भराभर जमूं लागले.

त्यानंतर दोन तीन निरनिराळीं दृश्यं दाखविण्यांत आलीं. ' दुष्काळ ' ह्याच मध्यवर्ति कल्पनेवर एक नाटिका करण्यांत आली. बहुतेक कार्यक्रम संपत आला होता. आतां राहिलं होतं—मीनाचा मूक अभिनय आणि नाच.

दिव्यांचा प्रकाश कमी करण्यांत आला. पडदा हळुहळू बाजूला सारण्यांत आला—

पहाटेच्या शांत शांत वेळीं साऱ्या जगावर कसली तरी अंधुक काळी छाया पसरली होती. त्या अंधुक प्रकाशांत एक तरुणी हिंडत होती. तिच्या हालचालींत कमालीचा हताशपणा भरला होता. तिनें वर आकाशाकडे पाहिलं—तों निस्तेज चंद्रमा—तिचं मन जास्तच खिन्न झालं. ती पुन्हां इकडे तिकडे हिंडूं लागली. तिची नजर गुलाबाच्या त्या कळीवर लागली. सूर्योदयाची उत्सुकतेनं वाट पहाणारी ती कलिका—त्या तरुणीनें त्या कलिकेला हळूंच स्पर्श केला. ती तरुणी त्या कलिकेशीं बोलूं लागली—

पडद्याच्या आंत मंगलनं जोगीया रागांतलं भावगीत सुरू केलं—गाण्याच्या अर्थाबरोबर मीना स्टेजवर मूक अभिनय करीत होती. ती म्हणत होती—

"कलिके, किती नाजूक अन् सुरेख आहेस ग तूं. तुझा हा आनंद, तुझं हें सुखी जिणं—पण हें सारं असंच टिकेल का ग ?

तो सूर्योदय पहाण्यासाठीं किती उत्सुक झाली आहेस तूं ! कां बरं ही उत्सुकता ? सूर्योदय होताच तूं उमलणार—तुझा विकास होणार म्हणून ? वेडे, कसं कळत नाहीं ग तुला ? जो क्षण तुला आत्यंतिक आनंदाचा, सौख्याचा वाटतो तोच क्षण तुझ्या दुःखाला कारणीभूत होणार. त्या उमलण्यांतच तुझा नाश—नको, नको तूं उमलूं नकोस. किती नाजूक आहेस तूं—तुझा निभाव जगाच्या ह्या स्वार्थी बाजारांत कसा लागणार ? हें जग फार फार स्वार्थी आहे ग आणि तूं अशी साधी. भोळी. तो भ्रमर येईल, त्या मधुमक्षिका येतील तुझी स्तुति करतील—तूं मनांत आनंदशील पण शेवटीं ? तुझ्यांतला मध गोळा करून तीं सारीं निघून जातील. तुला तुझं जिणं नकोसं वाटेल- तूं सुकून जाशील—मातीला मिळशील. म्हणून म्हणतें तूं उमलूं नकोस—अशीच मुग्ध कलिका राहा. पण छे ! तूं माझं थोडंच ऐकणार ? तो पहा पूर्वेकडे तांबूस प्रकाश—बघ. बघ—वायूच्या स्पर्शानं तुझी पाकळीन् पाकळी पुलकित होऊं लागली. तूं उमलणार ? कलिके, ऐक अजूनही ऐक. जग फार ढोंगी आहे, स्वार्थी आहे—पण छे ! तूं माझंच ऐकणार—"

कलिकेच्या नाशाच्या कल्पनेनं त्या तरुणीनं स्वतःचेच डोळे झाकून घेतले.

हळूं हळूं तो अन्धार नाहींसा झाला. सूर्याच्या कोमल किरणानं सारी सृष्टि पुलकित झाली. क्षणापूर्वीची ती मुग्ध कळी—पण ती कोठें होती आतां ? त्या ठिकाणीं आतां एक सुंदर टपोरं फूल आपल्या सुवासानं दाही दिशा दरवळून टाकीत होतं.

त्या वरचे ते दवबिंदू जगाकडे पाहून हंसत होते. हळुंहळूं ते जोगीया रागाचे सूर भैरवींत विलीन झाले. मंगलचा तो गोड आवाज—मूर्तिमंत आशाच गात होती—

" वेडे, जरा डोळे उघडून जगाकडे पहा-- कशी आनंदानं नाचत आहे सृष्टि. आणि तूं ? किती स्वार्थी आहेस ! क्षणाक्षणाला त्यागाचे धडे देणारा निसर्ग-- त्याच्यापासून कांहीं तरी शिकण्याचा प्रयत्न कर. आकाशांतले ते ढग पृथ्वीवर उडी घेतात. कां ? कोणासाठीं ? उदयास्ताचे वेळीं पूर्व—पश्चिमेला रंगाचे फवारे उडविणारा सूर्य—हें सारं कोणासाठीं. त्याच्या स्वतःसाठीं ? नाहीं—वेडे, तुझ्यासाठीं—साऱ्या जगासाठीं. दुसऱ्यासाठीं ..गण्यांत, दुसऱ्या जीवाला आनंद देण्यांतच जीवनाची सफलता आहे. उठ. डोळे उघड. नव्या दृष्टीनं जगाकडे पहा. क्षणांत नाहींसे होणारे हे दवबिंदू तुझ्याकडे पाहून हसत आहेत. "

त्या तरुणीनं हळूच डोळे उघडले. सारी सृष्टि आनंदानं हंसत होती—नाचत होती. त्या अंधाराचा आतां लोप झाला होता. त्या तरुणीचं ते म्लान मुख—हळू हळू त्या मुखावरची निराशेची छटा नाहींशी झाली. तिचे डोळे कसल्या तरी आनंदानं चमकूं लागले. तिच्या मुखावर हास्य विलसूं लागलं. तें नुकंच उमललेलं फूल किती तरी सुंदर दिसत होतं ! ती हळूच खालीं वाकली—त्या फुलांवर ओठ टेकले आणि लगेच दूर झाली.

क्षणांपूर्वी दुःखी हताश दिसणारी ती तरुणी देहभान विसरून सृष्टीबरोबर नाचत होती.

आतां ती म्हणत होती—

" फुलण्यांत—जगाला आनंद देण्यातच खरा आत्मविकास आहे. पहा—पहा—ह्या निसर्गाकडे पहा..."

हळूं हळूं पडदा पडला. नाच दिसेनासा झाला. पण, त्या गाण्याचे सूर

लोकांच्या कानांत घुमत राहिले. प्रत्येक मनुष्य दुसऱ्याला विचारीत होता—
" कोणाचा हा स्वर्गीय आवाज ? "

मीना मंगलच्या भोंवती गर्दी जमली. प्रत्येकजण दोघींना धन्यवाद देत होता. मंगल सुहास्य मुद्रेनं त्या स्तुति सुमनांचा स्वीकार करीत होती.

मिनीच्या कॉलेजमध्यें सहाच महिन्यापूर्वी दाखल झालेले प्रो. अविनाश त्यांच्या नेहमींच्याच पद्धतीनं किंचित पुढें झुकून लांब लांब पावलं टाकीत त्यांच्याजवळ आले—

" मिस् देसाई फार सुंदर नृत्य केलंत आज—" आणि लगेच मंगलकडे वळून ते म्हणाले—

" आपला आवाज कित्येक दिवस माझ्या कानांत घुमत राहील. "

आणि लगेच ते त्या गर्दीतून वाट काढीत आले तसे निघून गेले.

मीनीच्या कानांत तेंच एक वाक्य घुमत होतं—

" मिस् देसाई, फारच सुंदर नृत्य केलंत आज ! "

# ८

संथ वाहणाऱ्या नदींत कुणीतरी, कुठूनतरी येऊन हळूच दगड टाकावा—मग त्या नदीची इच्छा असो वा नसो— तिथें वर्तुळं निर्माण होणारच.

तसाच प्रकार झाला. त्याला वाटत होतं—आतां आपलं आयुष्य असंच संथपणें जाणार—त्यांत भावनेची तळमळ नाहीं—विकारांची खळबळ नाहीं—कांहीं एक नाहीं. आणि तसंच घडलं असतं तर ?—पण मग काल-चक्राच्या गतीला महत्त्व तें काय उरलं असतं !

आणि एक दिवस सकाळीं सुलोचनेचे काका त्या आश्रमाच्या आवारांत येऊन दाखल झाले. असे किती तरी मुलांचे पालक तेथें आपल्या मुलांना भेटायला येत असत. त्यांपैकीं ते एक होते. त्याच दिवशीं दुपारीं नानागुरुजी विरागला सांगत होते—

" सुलूचे काका तिला घरीं घेऊन जावं म्हणतात—" आणि त्यावर विराग म्हणाला होता—" आतां लोचनला परत जायला कसलीच हरकत नाहीं. तिचं शिक्षण पूर्ण झालं आहे. ती लिहूं शकते. आणि आतां ती गाते पण उत्तम. "

त्यानंतर दुसरेच दिवशीं सकाळीं त्या बकुळीच्या झाडाखालीं बसलेल्या सुलोचनेला विरागनें सहजच विचारलं—

" हं काय लोचन, तूं आतां जाणार म्हणे इथून. "

" छे ! कुणी सांगितलं ? " सुलोचनेनं शांतपणें विचारलं.

" म्हणजे ? तुझे काका आले आहेत ना तुला नेण्यासाठीं ? "

सुलोचनेनं हंसून उत्तर दिलं—

" ते कालच गेले. "

" आणि तूं गेली नाहींस ? " विरागला चांगलंच आश्चर्य वाटलं. सुलोचनेनं अनेकदां आपल्या काकांच्या प्रेमळ स्वभावाचं विरागपुढें वर्णन केलं होतं.

" तुझ्या काकांना फार वाईट वाटलं असेल, लोचन. कां बरं नाहीं गेलीस तूं ? "

" त्यांना खूप खूप वाईट वाटलं. पण माझा नाइलाज होता विराग—"

" म्हणजे ? " विरागच्या आश्चर्यांत जास्तच भर पडत होती.

" तेथें मला क्षणभरही रहावलं नसतं—छे ! जगणं सुद्धां असह्य झालं असतं. "

" अगदीं खुळी आहेस सुलोचना तूं. तुझ्या प्रेमळ काकांनीं कांहीं कमी पडूं दिलं नसतं तुला. निव्वळ वेडेपणा आहे हा तुझा. अजुनही कांहीं बिघडलं नाहीं. त्यांना पत्र लिही. नक्की येतील ते पुन्हां तुला घेऊन जाण्यासाठीं. कां मीच लिहून टाकूं पत्र त्यांना ? "

" नको—नको विराग. मी इथून जाणं शक्य नाहीं. "

" पण कां ? "

" कां ? कसं सांगूं तुम्हाला ? "

" घरीं न जाण्याला तसंच विशेष, मला न सांगण्यासारखं कारण असेल तर..."

" नाहीं—नाहीं. तसं कांहींच नाहीं. विराग, कसं सांगूं ? "

सुलोचनेचा आवाज कमालीचा कांपरा येत होता. मधून मधून अडखळत ती खोल आवाजांत बोलूं लागली—

" विराग, काका फार फार चांगले आहेत. त्यांनीं मला सुखांत ठेवलं असतं—कांहीं सुद्धां कमी पडूं दिलं नसतं. सारं खरं आहे. पण - पण तेथें तुमचा गोड आवाज मला ऐकूं येणार नाहीं. नाहीं—नाहीं. विराग, तुमच्या वांचून मी जगणं शक्य नाहीं. तुम्ही जिथें नाहीं तिथें मी..."

सुलोचना थरथर कांपत होती. उभं रहाणंही तिला शक्य झालं नसावं. ती

खालीं बसली. आंत बाहेर चोहोंकडे अंधार असूनही तिनं दोन्हीं हातांत तोंड झांकून घेतलं. निर्जीव, दगडी पुतळ्याप्रमाणें विराग उभा होता.

प्रार्थनेची घंटा झाली. जागेवरून उठून हळूहळूं सुलोचना निघून गेली. दुसरी घंटा झाली. स्वतःचेच पाय ओढीत तो प्रार्थना घेण्यासाठीं चालूं लागला. प्रार्थना संपली. सर्वांनीं हात जोडले. आंधळ्या मुलांना डोळे झांकून घेण्याची गरज नव्हती. कांहीं क्षण सारं कांहीं शांत झालं. तिसरी बेल झाली. हळूहळू मुलं उठून निघून गेलीं. विराग मात्र तसाच डोळे मिटून बसला होता. त्याच्या थरथरत्या ओठांतून अस्पष्ट शब्द उमटत होते—

" भगवान्, सर्वांना माझ्यापासून दुःखच व्हावं अशीच तुझी इच्छा होती तर हा मनुष्य देह तरी मला कां दिलास ?—त्यापेक्षां एकाद्या जहरी सर्पाचा तरी जन्म द्यायचा होतास—"

# १

" आपण मनांवर घेतलंत तर सहज जमण्यासारखं आहे. "

" गैरसमज आहे हा तुमचा. घरात सुद्धा ती कधीं गात नाहीं. त्या दिवशींच केवळ लहान बहिणीच्या हट्टासाठीं म्हणून झाली तयार गायला."

" पण आपण त्यांना विचारून तरी पहा. "

" त्यापेक्षा आपणच तिला समक्ष विचारा." आणि लगेच बाप्पानीं बेल वाजवून गड्या करवीं मंगलला बोलवणं पाठविलं.

" बोलवलंत बाप्पा मला ? "

" होय बेटा. हे ऑल इंडिया रेडिओकडून आले आहेत तुला भेटण्यासाठीं. "

मंगलनं बाप्पाजवळ बसलेल्या त्या गृहस्थांना नमस्कार केला.

" आपल्याला एक विनंती करण्यासाठीं आलों आहे मी—"

मंगलच्या डोळयांत प्रश्नचिन्ह दिसू लागलं.

" आपण रेडियोंत गाण्यासाठीं येण्याची तसदी—"

" मला गातां येतं हें कुणी सांगितलं आपल्याला ? "—मध्येंच किंचित् हंसून मंगलनं प्रश्न केला.

" परवाच्या थियेटरमधल्या प्रयोगानंतर सर्वांनाच तें कळून चुकलं आहे. कितीतरी पत्रं आलीं आम्हाला आपलं गाणं रेडिओंत ठेवण्याविषयीं—"

" असं होय. पण —पण —"

" नाहीं म्हणूं नका. फार लोकांची निराशा होणार आहे त्यामुळें. ह्या महिन्यांत आपल्याला येणं शक्य होईल ? "

" छे ! छे ! शक्य नाहीं तें. "

" मग केव्हां ? पुढच्या महिन्यांत ? "

" नाहीं. कधींच येणं शक्य नाहीं. "

" पण—क्षमा करा मला. आपल्या नकाराचं कारण विचारूं का मी ? —आपल्या वडलांची तर पूर्ण परवानगी..."

" छे ! तसं कांहींच कारण नाहीं. आपली निराशा करताना मलाही वाईट वाटतं पण नाइलाज आहे—मी गाऊं शकणार नाहीं.—शक्यच नाहीं तें. "

आणि आंत जाण्यासाठीं मंगल उठली सुद्धां.

" इच्छा आपली. ईश्वरानं इतका गोड आवाज दिला आहे. पण त्या दिव्य देणगीचं चीज आपण स्वतःच करायला तयार नाहीं. दूरपर्यंत आपला आवाज पोहोंचला असता. असा गोड आवाज ऐकून हजारों लोकांना आनंद......"

" खरंच ! खूप खूप दूर ऐकूं जाईल माझा आवाज नाहीं ? "—कसल्या तरी उत्कंठतेनं मंगलनं मध्येंच विचारलं.

" खूप दूर ! शेकडों—हजारों मैल दूर दूर. साऱ्या जगभर. "

" माझी तयारी आहे. आपण केव्हांही बोलवा. मी येईन. "

बाप्पाच्या तोंडून आश्चर्योद्गार निघाला—

" मंगल ! "

" काय बाप्पा ? जाऊं ना मी रेडिओंत गायला ? "

" अवश्य—अवश्य जा बेटा. "

बाप्पा मंगलच्या मस्तकावरून हात फिरवूं लागले. बाहेर पडतांना त्या नवख्या गृहस्थाच्या तोंडावरहि आनंद विलसत होता.

# १०

मंगल एका गोलचक्रापुढें उभी राहून गात होती. अगदीं जीव तोडून आळवीत होती.

कोणाला ?

हृदयाची हांक हृदयाला ऐकूं जाते म्हणतात. मग मंगलच्या हृदयाची हांक ज्याच्यासाठीं होती — त्या हृदयाला नाहीं का पोहोंचणार ? असं कसं होईल.

मग ! मंगलची हांकच हृदयापासून निघत नव्हती ? त्या करुण मूर्तीकडे पहा. तिची ती थरथर कांपणारी काया — तिच्या डोळयांतून ओघळणाऱ्या अश्रूंच्या सरी—काय अर्थ भरला होता त्यांत ?

प्रत्येक आलाप—प्रत्येक शब्द तिच्या हृदयापासून निघत होता. पण ते हृदयाचे बोल वाऱ्यावरच विरणार होते का शेवटीं ? असं होईल ? अशक्य.

व्यवहारी जगांतली देवाण—घेवाण फुकट जाईल. नव्हे तें जातच मुळीं फुकट. पण—प्रेमाश्रूंचें सिंचन...

लैला मजनूनीं परस्परांसाठीं गाळलेले अश्रू मौल्यवान मोत्याप्रमाणें जगानें अजूनहि जतन करून ठेविले आहेत,

मग मंगलचे अश्रू तरी कसे जातील फुकट !

# ११

कसल्या तरी कामासाठीं विराग त्या खोलींत आला आणि तेथें बसलेल्या सुलोचनेला पहाताच मागें परतला.

एक —दोन आणि तिसऱ्या पायरीवर त्याचे पाय खिळले. सहजच— अगदीं सहजच सुलोचनेनं रेडिओचं बटन दाबलं होतं.

त्याच्या जीवाला गुंगवून टाकणारा तो आवाज—त्याच्याच लेखणींतून उतरलेलें तें काव्य—(त्याचे पाय मागे वळत होते. मन पुढं जायला सांगत होतं. आणि तो मात्र जागच्या जागींच उभा होता)

कसलीही हालचाल करण्याची जणूं त्याच्यांत शक्तिच उरली नव्हती.

मन पुनः पुनः दरडावून सांगत होतं—' पुढं पाऊल टाक. रोज रेडियोंत किती तरी गायिका गातात. तूं कोठें ऐकतोस त्यांचं गाणं. त्यांतलीच ही एक गायिका. मग उगाच कां ही जीवाची ओढाताण. चल पुढें. '

सारी शक्ति एकवटून विरागनं पाऊल उचललं. तो पुढें चालूं लागला.

नभोवाणींतून ते बोल वाऱ्याबरोबर येऊन त्याच्या हृदयाला भिडत होते. गाण्याचे सूर खूपच उंच उंच चढूं लागले—

तो उभा राहिला. एक पाऊलहि पुढें टाकणं शक्य नव्हतं आतां त्याला. डोळयांतून खळकन् दोन अश्रू खालीं ओघळले—मातीला—नव्हे—

अश्रूंना अश्रू मिळाले.

हृदयाची हांक हृदयाला ऐकूं गेली. पण त्या हांकेला उत्तर ?

गोलघुमटांत एकाच शब्दाचा फक्त सात वेळां प्रतिध्वनि निघतो. हृदयापासून आलेल्या त्या बोलाचा सातदा—नव्हे सत्तर वेळां—नव्हे—सात सत्तर हजारदां त्या दुसऱ्या हृदयांत प्रतिध्वनी निघाला. पण उत्तर ?

तें फक्त काळाच्या हातीं होतं !

# १२

" रेडीयोंत गायला तयार झाली तेव्हां मला वाटलं होतं—हा उत्साह असाच कायम राहील. "

" अलिकडे तर जास्तच उदास झाली आहे मंगल. "

" काय करूं जगदीश ? पोरीचा तो उदास चेहेरा पहात रहाण्यापेक्षा देवानं माझे डोळे लौकर झाकले—"

" कांहीं तरी काय वेड्यासारखं बोलतो आहेस माधव—यातूनच मार्ग काढला पाहिजे. हें बघ बऱ्याच दिवसांपासून माझ्या मनांत एक विचार घोळतो आहे—" बाप्पा जगू काकाकडे पाहूं लागले.

" सुरेन् एकाएकीं निघून गेल्यानंतर त्याचा विषय मंगलपुढें अजून कोणीच काढला नाहीं. नाहीं ? "

" तिच्याकडे पाहिलं कीं त्याविषयीं बोलण्याचा धीरच होत नाहीं. "

" तोच करणार आहे मी. मनांत सलणारं दुःख एकदां मोकळेपणानं बोलून टाकल्यानंतर तिच्या मनावरचं दडपण खचित कमी होईल. " जगू-काका उठले. खोलींत दोनचार फेऱ्या घातल्या. स्वतःच्याच मनाची तयारी करीत असावेत ते आणि शेवटीं मनाचा निश्चय करून मंगलच्या खोलीकडे वळले.

" काय पहाते आहेस मंगल ? " आकाशांत जमूं पहाणाऱ्या काळ्या ढगांकडे एकाग्रतेनं पहाणारी मंगल चांगलीच दचकली.

" कोण—काका—तुम्ही --केव्हां आलांत काका ? "

तिच्या प्रश्नाला उत्तर न देतां ते तिच्याजवळ गेले. तिच्याकडं एकदां निरखून पाहिलं आणि मग तिचा हात धरून खालीं बसवलं.

" मंगल, काळ्या ढगाकडे पहात जाऊं नकोस म्हणून हजारदां मांगितलं तुला". अपराधी मुद्रेनें मंगल खालीं पाहूं लागली. हाताची उगाच चाळवा-चाळव सुरू केली.

" ह्या अशा ढगांतच वीज चमकते. लहानपणीं त्या वीजेच्या प्रकाशानेंच तुझी दृष्टी गेली होती. परवां डॉक्टरनीं काय मागितल - आठवतं ना ? पुन्हा जर वीज चमकतांना पाहिली तर... मंगल, मंगल आमच्या कोणाचीच दया येत नाहीं का ग तुला ? "

" काका चुकले मी—पुन्हां नाहीं पहाणार आकाशाकडं—खरंच नाहीं पहाणार. रागावलांत काका ? हंसा ना काका..."

" मी हसूं ? आणि तूं ? अशीच रडत रहाणार होय ना बेटा ? "

मंगल अस्वस्थ झाली. तिचे डोळे भरून आले.

" काका, माझा जन्मच रडण्यासाठीं आहे. मी तरी काय करूं ! "

" नाहीं मंगल. मनुष्य जन्माला आल्याबरोबर रडत असला तरी तो रडण्यासाठीं खास जन्माला येत नाहीं. रडणं ही माणसाच्या अज्ञान स्थितीची पहिली पायरी आहे. सुरवातीच्या रडण्याचा शेवट हंसण्यांत करायचा कीं रडण्यांत करायचा हें देवानं माणसावरच सोपवलं आहे. "

" काका, कसं सांगूं मी माझं दुःख तुम्हांला. "

" बेटा मनुष्य स्वतःच अग्नि निर्माण करतो—फुंकर घालून चेतवतो आणि स्वतःच स्वतःला जाळून घेतो. "

" तुम्हाला सारं काहीं ठाऊक आहे काका माझं दुःख मीच निर्माण केलं ? आयुष्यांत एकाद्यावर प्राणापलिकडे प्रेम करावं परमेश्वरापेक्षांहि तो अधिक आदरणीय वाटूं लागावा आणि त्यानंच शेवटीं प्रतारणा करावी. काका, ह्यापेक्षां अधिक दुःख कोणतं ? - "

" आयुष्यांत अनेक दुःखद घटनांपैकीं ती एक घटना आहे—हें कबूल आहे मला. पण त्यासाठीं सतत रडत रहाणं—स्वतःला जाळून घेणं मूर्ख पणाचं आहे. मंगल तूं शहाणी आहेस ! विचारी आहेस. काव्यात, नाटकांत

किंवा कादंबरींत ज्याला प्रेम म्हणतात त्या प्रेमाचं स्वरूप थोडंसं बदलून बघ. बेटा, त्या प्रेमाला कर्तव्याची जोड दे. आजची तुझी ही हुरहूर एखाद्या ध्येय प्राप्तीसाठीं खर्ची घाल. आणि मग पहा—तुझी ही आजची निराशेची पाउल वाट उद्यां तुला आशेच्या राजमार्गावर नेऊन सोडील."

"आशा ! कसली आशा करायची आतां काका ? सारा जन्म हा असाच रडण्यांत—"

"भ्रम आहे हा तुझा. आजच्या तुझ्या ह्या मनःस्थितींतून फक्त दोनच मार्ग निघतात. एका मार्गानं गेलीस तर तुझा स्वभाव कुढा, एकलकोंडा होऊन तूं अधिकच दुःखी होशील. मनाची निराशा कायम ठेवण्यासाठींच तूं प्रयत्न करीत रहाशील. आणि दुसऱ्या मार्गानं गेलीस तर तुझा स्वभाव हंसरा, खेळकर, दयाशील, आशावादी आणि निर्भय बनेल. तूं स्वतः हंसत रहाशील आणि स्वतःबरोबर जगालाही हंसवशील. मंगल—राजा, तूं दुसऱ्या मार्गानं जा. मनुष्य फक्त स्वतःसाठीं जगतो तेव्हाच तो दुःखी रहतो. दुसऱ्यासाठीं जगण्याचा प्रयत्न कर—तुझ्या बाप्पाना—तुझ्या मिनीला—तुझ्या दुबळ्या काकाला समाधान..." जगू काकांचा गळा दाटून आला. कांहीं क्षण दोघंही स्तब्ध होतीं. जगूकाका उठले आणि बाहेर गेले. कितीतरी वेळ मंगल मात्र तशीच बसून राहिली.

"मंगल—मंगल—ए मंगल—" मान वर करून तिनें पिंजऱ्याकडे पाहिलं. सोनेरी सळयांना धरून तिचा किशोर तिच्याकडे पहात होता. ती उठली. खिडकींत गेली. मघाचे ते काळे ढग पार कुठल्या कुठं नाहींसे झाले होते. तिनं खालीं पाहिलं—पाण्याचे कांहीं थेंब पानांफुलांवर नाचत होते. म्हातारा सदुमाळी आपल्या नातवाला ढगा आडून डोकावणारं इंद्रधनुष्य दाखवीत होता. म्हाताऱ्याच्या नातवाबरोबर मंगलही तें इंद्रधनुष्य पाहूं लागली.

क्षणकाळ टिकणारं हें इंद्रधनुष्य कितीतरी डोळयांना आनंद देऊन लय पावतं. इंद्रधनुष्याचे ते सारे रंग—कुठें हिरवा, पिवळा, निळा मध्येंच लाल—सारे सारे रंग आहेत इथं. मंगलला न आवडणारे ते दोन रंग पण तेथें होते.—सहज निसर्गानें आले होते ते. आणि तें दोन रंग तेथें नसते तर इंद्रधनुष्याची शोभा खात्रीनं कमी झाली असती.

मानवी आयुष्यांत दुःख आहे म्हणूनच जगण्यांत......

किती तरी विचार मंगलच्या मनांत आले आणि गेले. "मंगल—मं-ग-ल—" काय हवं होतं तिच्या किशोरला ?

मंगल पिंजऱ्याजवळ गेली. किशोर गप्प राहिला.

"ऐकलंस किशोर, मी दुसऱ्याच मार्गानं जाणार. बाप्पासाठीं, काकासाठीं, मीनीसाठीं, तुझ्यासाठीं, साऱ्या साऱ्या जगांसाठीं जगणार—हसत जगणार !"

किशोरनं मान वाकडी करून तिच्याकडं निरखून पाहिलं आणि कसला तरी चित्कार दिला.

# १३

मीनी आपली स्वतःशींच खेळत होती. एकाद्या लहान मुलाबरोबर खेळा-यला कोणी दुसरं नसलं म्हणजे तें मूल मालक, गडी, इंजिन ड्रायव्हर, शाळेतला मास्तर, सर्कशींतला विदूषक —साऱ्या भूमिका स्वतःच करून वेळ भागवून नेतं. तसाच कांहींसा प्रकार आज चालला होता

ती आरशासमोर उभी राहिली—वेडावून दाखवायला दुसरं कोणी नाहीं म्हणूनच कीं काय तिनं स्वतःलाच वेडावून दाखवलं—' एहेरे ! काय पण ध्यान—दिवे ओवाळा ! " आणि लगेच स्वतःभोवतींच गिरक्या घेत ती आरशापासून दूर झाली.

मधल्या टेबलावर ठेवलेली ती फुलदाणी—पण तो व्यवस्थितपणा मिनीला आज मानवला नसावा. नाहीं तर तीं सुंदर, नाजूक फूलं त्यांचा कांहीं अपराध नसतांना जमिनीवर विखुरलीं गेलीं नसतीं.

मध्येंच तिनं अशी एक तान मारली कीं—बस्स ! स्वतःच स्वतःचे कान झाकून घेतले म्हणून ठीक !

आणि मग मात्र हाताचे दोन्ही पंजे एकमेकांवर हळुहळु घाशीत ती एक दोन क्षण स्वस्थ उभी राहिली.

आतां कुठचा खेळ खेळावा याचाच विचार चालला असावा—स्वतः-वरच खूष होऊन तिनं टाळी वाजविली. लगेच पुढच्या खेळाची तयारी सुरू झाली. चष्मा, नेहरू शर्ट—खेळाला लागणारा बहुतेक सारा सरंजाम तयार

होता. आरशासमोर जावून सैल वेणी अजून जरा सैल केली. केस उलटे फिरवले. साडीवरच तो शर्ट चढवला. नाकावर चष्मा बसला. आरशासमोर जावून ती निरखून पाहूं लागली—

'छे! कुठं तरी चुकत आहे—'

चुकत कसलं होतं? सारं कांहीं व्यवस्थित जमलं होतं—पण ते फोटो मिनीला बाहेर काढायला हवे होते. आणि स्वतःच्या मनाला सांगायला कांहीं तरी निमित्त हवं होतं.

टेबलाच्या खणांतून तिनें ते फोटो घेऊन ती पुन्हां आरशासमोर येऊन उभी राहिली. केस अजून जरा मागें केले. शर्टचं वरचं बटन काढलं—आणि आतां मात्र मिनीच्या मनासारखं जमलं. मधल्या टेबलावरच्या वस्तू भराभर दूर फेकल्या गेल्या.

दोन चार जाडजूड पुस्तकं हातात कशीं तरी सावरून धरीत किंचीत पुढें झुकून लांब लांब टांगा टाकीत मिनीची स्वारी टेबलाजवळ आली. हातांतलीं पुस्तकं टेबलावर ठेवून कपाळावरचा घाम पुसण्यासाठीं खिशांतून रुमाल—पण होता कुठं रुमाल? मिनीनं तोण्ड वाकडं केलं—'एवढी तयारी करूनही शेवटीं झालाच घोटाळा!' पण तेवढ्यासाठीं मिनी अडून थोडीच रहाणार होती? शर्टच्या बाहीनंच कपाळावरचा घाम पुसून तिनें लगेच सुरवात केली—

बापरे! त्या वेशांत आणि लेक्चर देण्याच्या आवेषांत मिनीला जर कोणी पाहिलं असतं तर—पण तसं कशाला तिच्याच कॉलेजमधल्या प्रो. अविनाशनी मिनीला त्यावेळीं पाहिलं असतं तर क्वचित् आणि तेही किंचित् हंसणारे अविनाश अगदीं पोट धरून हसले असते. आपली इतकी हुबेहूब नक्कल करणाऱ्या मिनीला त्यांनीं नक्कीच एक जाडजूड पुस्तक बक्षिस दिलं असतं.

लेक्चर अगदीं रंगांत आलं होतं आणि हें कोण आलं वर्गात इतक्या उशीरां? किंचित् रोषानं प्रोफेसरसाहेबानीं चष्म्यांतून बाजूला पाहिलं—

"आक्का—आक्का—"

मिनीची तारांबळ उडाली. चष्मा, पुस्तकं आणि त्यांतून ते उघड्यावर टाकलेले फोटो लपवितां लपविता पुरेवाट झाली. आणि गोंधळलेल्या मिनीकडे पहात मंगलनं हंसत विचारलं—

" काय चाललं होतं ? "

काय तरी आक्काचा प्रश्न हा ? बिचारी मिनी स्वतःला सावरून घ्यायला गेली—

" दोन महिन्यावर आली आहे म्हटलं आमची परीक्षा. "

" अस्सं ! अभ्यास चालला होता वाटतं बाईसाहेबांचा—चालूं द्या—चालूं द्या. उगाच आमची मध्यें अडचण नको—"

आणि खरंच आक्का परत जायला निघालीसुद्धां.

" आक्का, ए आक्का—"

" अभ्यास चालला आहे ना तुझा ? दोन महिन्यावर आली आहे म्हटलं परीक्षा..."

मिनी हसूं लागली. आक्काही हसूं लागली आणि हंसतां हंसतांच एकदम गंभीर झाली—

" मिना, "

" आक्का—" मिनीच ती ! आक्कापेक्षांही गंभीरपणें तिनें ' ओ ' दिली.

" तुला कांहीं सांगण्यासाठीं आलें आहे मी मुद्दाम. "

मिनी अंग झटकून—श्वास कोंडून ताठ बसली.

" थट्टा नाहीं करीत मी. "

मिनीनं फक्त आक्काकडे पाहिलं. तिचे डोळे म्हणत होते—" बघ आतां—मी एक शब्द तरी बोललें का ? तूंच आपली..."

" पुढच्या महिन्यांत मीना देसाई नांवाच्या नाचऱ्या, खट्याळ, खोडसाळ मुलीच्या पायांत आम्हीं बेड्या घालण्याचा निश्चय केला आहे. "

" स्तुत्य आहे हेतु आपला. "

" स्तुत्य आहे ना ! शुं...सुटलों एकदाचे काळजींतून. बाकी जमुनाकाकींच्या मन्यासारखा जावई मिळवायला..."

" कोण ? कोण म्हणालीस ? "—मिनीनं दरडावून विचारलं.

" पुन्हा पुन्हां नाव ऐकावंसं वाटतं. नाहीं ? हं बाकी स्वाभाविकच आहे म्हणा. रूप गोड, नांव गोड—मनोहर—मिनी मन्या —"

" आक्का—आक्का बघ हं—"

" बाकी मन्या असा सुरेख शोभेल नवरदेव—त्या मुंडावळ्या—बोट चोखीत त्या मुंडावळ्यांतून तिरक्या नजरेनं—"

" आक्का—आ ऽऽऽ " मिनी अगदीं रडकुंडीस आली होती.

" बाकी आमच्या मिनीवर मन्याचं भारी प्रेम. काय ग, अजूनही रोज तुझ्या कॉलेजच्या रस्त्यावर त्या झाडाखालीं तुझी वाट पहात उभा असतो ना तुझा मन्या—नाहीं—नाहीं—मनोहरपंत ? "

" आ ऽऽक्का "—आणि खरंच कीं मिनीनं गुडघ्यांत मान घालून रडायला सुरवात केली.

" हं आतां कसं ?—मग सांग पाहूं झटपट आमच्या मिनीवर मोहिनी घालणाऱ्या त्या जादुगाराचं नांव. हं चल आटप लौकर. लगेच मग बाप्पाना सांगून पुढच्याच महिन्यांत शुभमंगल..."

मिनीनं मान वर केली. चांगली हंसत होती कीं मिनी. बाकी त्या पोरीला खोटं रडतां येणं सुद्धां कठीणच !

" हं ' मंगल ' वर थांबलीस तेंच बरं केलंस. आमचं सावधान व्हायच्या आधीं ह्या मंगलचा निकाल लावला पाहिजे ना—"

" म्हणजे ? "—मंगलनं चमकून विचारलं.

" म्हणजे वाघाचे पंजे ! म्हटलं आक्कासाहेब, आधीं मोठ्या बहिणीचं लग्न झाल्याखेरीज धाकटी बहीण कशी बोहल्यावर चढणार ? माझं लग्न अजून एका महिन्यांनीं तर तुझी वरात निघाली पाहिजे अजून पंधरा दिवसांनीं. "

मंगलनं टेबलाचा आधार घेतला. बिचारी मंगल ! कित्येक वर्षांनीं ती आज इतक्या मोकळेपणानं हसली होती. मिनीची खरी खुरी बहीण झाली होती. ' वेडे, कशाला भलतीच थट्टा करायला गेलीस ? स्वतःच जखमेची खपली काढलीस. दोष कुणाचा ? '—तिचंच मन तिला दोष देऊं लागलं.

डोळयांत जमणारे आंसू लपविण्यासाठीं ओठावर उसनं हांसूं आणून मंगल म्हणत होती—" वेडी ! अगदींच वेडी आहे आमची मिनी—" आणि वेडीच नाहींतर काय ?

तिची आक्का सारखं विचारीत असूनही तें गोड गुपित मिनी आक्काला सांगत नव्हती.

काय म्हणावं ह्या वेड्या पोरीला ?

वेडी मिना ! दुसरं काय.

# १४

" विराग भय्या---"

" काय आनंद ? "

" भय्या तुम्ही कोणाचे ? "

" म्हणजे ? "

" बरं का भय्या, काल मी सुलोचना ताईला म्हणालों कीं परवां तें रेडि-योंत मंगलादेवी गाणं म्हणाल्या तें गाणं शिकव तर सुलोचनाताई म्हणाली —जा—मी नाहीं शिकवणार ! मग मी म्हणालों नाहींतर नाहीं जा. एवढी कशाला तुझी मिजास. मला माझे विराग भय्या शिकवतील तें गाणं—मग सुलोचनाताई म्हणाली......"

आनंद आपलं गाऱ्हाणं संथपणें सांगत होता. विरागभय्याही तेवढ्याच शांतपणें ऐकत होता.

" सुलोचनाताई म्हणाली कीं तुझे कुठले आले आहेत विराग ते माझे आहेत. मग मी म्हणालों—नाहींच मुळीं विरागभय्या माझेच आहेत पण भय्या ती मुळीं माझं ऐकेनाच. फार भांडखोर आहे नाहीं आपली सुलोचनाताई ? "

एकंदरींत आनंदचा पराभव झाला असावा त्या लढ्यांत. नाहीं पेक्षां ही त्याची यशस्वी माघार—" मग मी म्हणालों—सुलोचनाताई, विरागभय्या तुझे आहेत --माझे आहेत—गुरुजींचे आहेत पण विरागभय्या, तरी सुद्धां ऐकेना ही सुलोचनाताई. ती म्हणूं लागली ' नाहींच मुळीं. विराग तुझे

नाहींत. गुरुजींचे नाहींत ते फक्त माझेच आहेत.' मग भय्या, मला पण खूप खूप राग आला. मग मी तिला म्हणालो. चल भय्याकड आणि विचार. पण ती म्हणाली ' तूंच जा आणि ये विचारून.' सांगा ना विरागभय्या तुम्ही कोणाचे ?"

" अं—काय म्हणालास ?" अजूनही मधून मधून भ्रमिष्टपणाचा झटका येत होता तर विरागला.

"तुम्ही कोणाचे आहांत विरागभय्या ?"

" मी तुझाच आहे आनंद—"

" माझे—भय्या ! सुलोचनाताईचे नाहींतच मुळीं—" आनंद आनंदानें टाळ्या पिटूं लागला.

" ऐकलस आनंद—" त्याच्या खांद्याला विरागनें स्पर्श केला. टाळी देण्यासाठीं दूर केलेले हात तसेच ठेऊन आनंद उभा राहिला—

" तूं सुलोचनाताईला सांगितलंस ना तेंच बरोबर आहे. तूं फार शहाणा मुलगा आहेस."—खाऊतला अर्धा वांटा दुसऱ्या भावाला द्यायला सांगतांना आई असंच सांगत असते.

" मी तुझा, गुरुजींचा सर्वांचाच आहे."

" आणि सुलोचनाताईचे सुद्धां ?"

जणूं कांहीं सुलोचनाताई सर्वांच्यांत समावतच नव्हती.

" हो. सुलोचनाताईचा आणि तुझा पण—" सबंध पेढा हातांत पडण्याऐवजीं अर्धाच पडला होता.

आनंद मनांतून थोडासा नाराज झालाच. पण लगेच त्यानें स्वतःचीच समजूत करून घेतली—

हरकत नाहीं. गुरुजी नेहमीं सांगतातच कीं आपल्या खाऊंतला अर्धा खाऊ दुसऱ्यांना द्यावा—

जसा कांहीं आनंदनेंच आपल्यांतला अर्धा वाटा सुलोचनेला दिला होता ! आणि मग स्वारी डुलत डुलत स्वतःशींच हसत निघून गेली.

विराग स्वतःशींच म्हणत होता.—

" कांहीं तरी मार्ग शोधलाच पाहिजे नाहींतर तिचं हें वेड असंच वाढत जाईल आणि—"

# १५

दिवसेन्‌दिवस तिचं तें वेड वाढतच होतं. मिनीच्या नाचण्यागाण्याला ताळतंत्रच उरला नव्हता.

मंगलही पूर्वीपेक्षां बरीच आनंदांत दिसत होती. पण पृथ्वीलाही अंतरंगांतली उष्णता असह्य होतेच कीं कधीं कधीं. तसंच होत असावं मंगलचंही. मध्येंच ती शांत अगदीं शांत बसून राही. तिच्या डोळयांत खिन्नता स्पष्ट दिसूं लागे.

आणि मग जगूकाका एक शब्दही न बोलतां तिच्या पाठीवरून हात फिरवीत. तिचा लाडका किशोर ओरडूं लागे—

“ मंगल—ए मंगल ! ”

आणि मग मंगल पुन्हां घरांत वावरूं लागे. हंसूं लागे.

असेच दिवसामागून दिवस जात असतांना एक दिवशीं सकाळीं जगूकाकांनीं बाप्पांना विचारलं—

“ मग काय सांगूं त्यांना ? ”

“ मी तरी काय सांगूं जगदीश ? तूं सर्व जाणतो आहेस. असं चांगलं स्थळ मिळायला भाग्य पाहिजे. ”

“ तेंच तर म्हणतों आहें मी. काल पुन्हां ते मला भेटले. बाकी कांहीं म्हण माधव, हीं विद्वान माणसं भारी एकमार्गी. ह्याचंच बघना इतके दिवस इतक्या मुली सांगून आल्या पण ह्या भल्या गृहस्थानें त्या नुसत्या पहाण्याचे

पण श्रम घेतले नाहींत तेव्हां म्हणे लग्न करण्याचा विचारच नव्हता स्वारीचा. आणि परवां मंगलचं थिएटरमधलं गाणं ऐकल्यापासून आयुष्यांतल्या प्रवासांत जोडीदारणीची आवश्यकता वाटूं लागली. मला तर भिती वाटते—जर मंगल मिळाली नाहीं तर आजन्म अविवाहीत राहाण्याची प्रतिज्ञा –"

"छे! मला नाहीं तसं वाटत."

"कल्पना नाहीं माधव तुला. ह्या असल्या ध्येयनिष्ठ माणसांची दृष्टि एकाग्रावर स्थीर होण्याचाच अवकाश मग ती दृष्टी कधींच चळायची नाहीं. मंगलनं होकार दिला तर दोघही सुखी होतील—खात्री आहे माझी."

"मलाही तसंच वाटतं. पण—कसं शक्य आहे तें!"

"मंगलचं मन वळवण्याचा प्रयत्न केला तर?"

"प्रयत्न करून पहा. पण मला नाहीं वाटत तुला त्यांत यश येईल असं."

"आणि समज आलंच तर—"

"तर—तर—तुझे उपकार जन्मभर—"

जगूकाकांनीं बाप्पाचे हात धरले.

"काय बोलतो आहेस हें! तुझ्या माझ्यांत उपकाराच्या गोष्टी?"

आणि मग दुसऱ्याच दिवशीं जगूकाकांनीं मंगलला बागेंत गांठलं. तेहि तिच्याबरोबर बागेंत हिंडूं लागले.

"अरे वा! यंदा मोगरीला चांगलाच बहर आला आहे कीं. ही रातराणी वाटतं." जसं कांहीं जगूकाकानीं रातराणीचं झाड कधीं पाहिलंच नव्हतं. त्यांचं मन मात्र मुख्य विषयाला सुरवात कशी करावी ह्याचाच विचार करीत असावं.

वेळ चांगली असली कीं माणसाला मार्ग आपोआपच सांपडतो. साऱ्या गोष्टी सहज जमून येतात. मध्येंच थाबून मंगलनं माळयाला हांक मारली.

"कायरे, ही वेल कशानं सुकली?"

जगूकाका आणि माळी दोघेही त्या सुकलेल्या वेलीकडे पाहूं लागले.

"येल आधारावांचून बघा जगत नाय." म्हाताऱ्या माळयानं जगांतला साधा नियम सांगितला.

"तें आहे रे मला ठाऊक, पण त्या वेलीला आधार कां नाहीं दिलास?"

म्हाताऱ्या माळयाच्या तोंडावर मिस्कील हास्य झळकलं. कांहीं तरी

गमतीदार उत्तर द्यायचं होतं त्याच्या मनांतून मंगलला—पण अंगाखांद्यावर खेळवली असली तरी बी मालकाची मुलगी ! तो कांहींच बोलला नाहीं.

" तुला मी हजारदा सांगीतलं बागेतलं कुठचंही झाड कोमेजलेलं मला आवडत नाहीं. त्या वेलिची वेळींच काळजी घ्यायला हवी होतीस. मला सहन नाहीं होत हें—कितीदारे सांगायचं तुला. "

—मंगल असाह्यतेनें बोलत होती. शेवटीं वेलीवरची नजर तिनं काढून घेतली. ती पुढं चालूं लागली जगूकाकाही तिच्यावरोबर चालूं लागले म्हातारा माळी निमूटपणें सुकलेली वेल गोळा करूं लागला.

बराच वेळ कोणीच कोणाशीं बोललं नाहीं. शेवटीं मंगलला ही स्तब्धता जाणवली असावी.

" काका, गप्पसे आहात आज. "

" छे. छे. उगाचच. "

" म्हाताऱ्यावर रागावलें मी म्हणून रागावलात होय काका माझ्यावर ? त्याला मी ह्यापूर्वी हजारदां बजावून सांगितलं असेन—पण त्याची तरी काय चूक म्हणा. खरं सांगूं काका, हें असं कांहीं पाहिलं कीं माझं मन बेचैन होतं. "

" त्याचाच तर मी विचार करतों आहे—मंगल. "

" कसला विचार काका ? "—कसलीच कल्पना न येऊन मंगलनं विचारलं.

जगूकाकांनीं मंगलकडे एकदां निरखून पाहिलं आणि मग समोर पहात ते संथपणें बोलूं लागले—

" मंगल सुकलेली वेल पाहून तुला वाईट वाटतं—त्या वेलीच्या विचारानं तूं दुःखी होतेस. खरं ना ? "

' असं होतं, खरं. "

" तूं स्वतःकडे कधीं पाहिलं आहेस ? साऱ्या जगाकडे—लहानशा झुडपाकडे—सहानुभूतीन पहाणारं मन स्वतःच्या विषयींच इतकं निष्ठूर कसं होतं ? "

" तसं कांहीं—काहीं नाहीं काका—" मंगल अडखळूं लागली.

" तसंच आहे मंगल हें. वास्तविक तुझ्यांत अन् त्या सुकलेल्या वेलींत काय फरक आहे ? "

मंगल स्तब्ध राहिली. काय देणार उत्तर ती ? तिचे काका एक कठोर सत्य बोलून दाखवित होते.

" तें पाहिलस. "

मंगलनं तिकडे पाहिलं. एका मोठ्या वृक्षाचा आधार घेऊन फोफावलेली ती वेल—कशी अगदीं सुरेख दिसत होती,

" आधारावाचून वेल जगत नाहीं. साधं तत्व आहे हे बेटा. '

आता मंगलच्या लक्षात जगूकाकाच्या बोलण्याचा रोख थोडाबहुत आला आज अजून काय सांगायचं आहे जगूकाकाना ?

काहींतरी बोलण्यासाठीं मंगलचे ओठ थरथरले.

" बोल— बोल मंगल. "

" तुमचं म्हणणं खरं आहे काका—पण साऱ्याच वेलींना असा आधार मिळेलच असा भरंवसा नाहीं. आणि—त्यातून कुणी सांगावं काका, त्या वेलीला तस सुकून मरण्यांतच आनंद वाटत नसेल कशावरून ? "

" नाहीं मंगल चुकते आहेस तूं. स्वत:साठीं जगण्यात, स्वत:साठींच मरण्यांत कुणालाच—अगदीं वृक्षांनासुद्धा—आनंद वाटत नसतो. कुणाकडून तरी संरक्षण करून घेण्याची आणि कोणाचं तरी संरक्षण करण्याची एक सुप्त इच्छा प्रत्येक प्राणीमात्रांच्या ठिकाणीं असतेच असते. ती वेल आणि तो वृक्षच पहा. सारं जग क्षणभंगूर आहे. सारेच जीव काळाच्या प्रवाहाबरोबर वहात जात आहेत. पण वहात जाताजाताच त्यांतला प्रत्येक जीव दुसऱ्या जीवाला हातभार लावतो, शक्य ती मदत करतो, धीर देतो. आणि यांतच खरा आनंद आहे, जीवनाची सफलता आहे बेटा. "

" ह्या वेलीसारखं जगता आल तर अवश्य जगावं काका. त्यांत आनंद आहे, जिवंतपणा आहे—सारं खर आहे. पण काका, एकाद्या वेलीला मुळांतच पीळ पडला असेल तर—". काका हंसत होते. बोलतां बोलतांच मंगल थांबली. " हें पाहिलेंस " जगूकाका कपाळावरच्या, हातावरच्या जखमेच्या खुणा दाखवीत होते.

" आणि त्याहूनहि अधिक तीव्र स्वरूपाच्या जखमा माझ्या हृदयाला झाल्या आहेत. त्याचे खोल व्रण अजूनहि तेथें कायम आहेत. पण मी जीव दिला नाहीं. जन्मभर रडतहि बसलों नाहीं. "

मंगलेच्या नजरेपुढून काकांच्या आयुष्याचा तो दुःखद चित्रपट क्षणार्धांत सरकला.

" पण काका, सर्वांच्याच ठिकाणीं तें धैर्य नसतं. "

" आपणच आधीं दुसऱ्यांना तें देऊन मग स्वतःसाठीं मिळवायचं असतं. आपलेपणांत उत्पन्न होणारी ती आशा, तो उत्साह काय करून दाखवीत नाहीं जगांत ? " जगूकाका क्षणभर थांबले. आणि पुन्हां बोलूं लागले. आतां त्यांचा आवाज खूपच खालीं आला होता.—प्रत्येक शब्द हृदयापासून मनस्वी तळमळीनं निघत होता.

" मंगल — राजा, नीट ऐक. प्रेमाचं प्रतीक म्हणून पुरुषाला स्त्री हवी असते. आणि मूर्तिमंत कर्तव्याची प्रतिमा म्हणून स्त्रीला पुरुष हवा असतो. कर्तव्य आणि प्रेम — पुरुष आणि स्त्री — जगात ईश्वरानं निर्माण केलेल्या ह्या दोन जाती एकमेकावाचून पूर्णत्वाला पोहोंचत नाहींत—"

बोलतां बोलतांच जगूकाकानीं मंगलकडे पाहिलं. ती अगदीं शांत होती. तिच्या चेहेऱ्यावर कसलेच भाव दिसले नाहींत.

" विचार कर मंगल. ह्या पूर्वीच तुझ्यापुढें हें सारं बोलावंसं वाटत होतं. पण तुझ्या जिवाला तें कितपत पटेल याची शंका वाटत होती. तूं सुज्ञ आहेस. विचारी आहेस. कन्या, भगिनी, कांता आणि माता—स्त्रीच्या आयुष्यांतल्या अत्यंतमहत्त्वाच्या अशा ह्या चार अवस्था आहेत. पहिल्या दोन अवस्थांतून आज तूं आयुष्याच्या मध्यावर येऊन पोहोंचली आहेस. पुढच्या दोन्हीं अवस्थांतून जाण्यासाठीं मनाची तयारी कर बेटा—"

स्वतःशींच विचार करण्यासाठीं मंगलला एकटीच सोडून जगूकाका निघून गेले — अचानक एक नवं दालन खुलं करून निघून गेले. विमनस्क स्थितींत मंगल उभी होती. दृष्टी अगदीं अचल होती. एकाद्या वस्तूवर बराच वेळ नजर लावली तर डोळयात पाणी जमतं—

डोळयावर पाण्याचा पडदा येऊन तिला पुढचं कांहींच दिसेनासं झालं. पूर्वीच्या आंधळेपणाची आठवण—पाठीमागून मांजराच्या पाऊलानं येऊन मिनीनं मंगलेचे डोळे झांकले, आणि हाताला चटका बसावा तसा चटकन हात काढून घेतला—

" आक्का—आक्का. "

मंगलनें डोळे पुसले.

" खरंच मिनी मी पुन्हा आंधळी झालें तर—"

मिनीनं आक्काच्या तोंडावर हात ठेवला.

" आक्का—" मिनीच्या हृदयाची तळमळ, तिचं तिच्या आक्कावरचं उत्कट प्रेम त्या दोन अक्षरांत भरलं होतं.

मंगल हसली. कसलं तें उदास, हास्य !

मिनीच्या आंगावर शहारे आले.

तिच्या अक्कानं सतत हंसत रहावं असं तिला सदैव वाटत असे. पण हें हास्य ! त्यापेक्षां ती रडली असती तर ?

# १६

रात्रीच्या शांतवेळीं विराग स्वतःच्या खोलींत त्याचं तें आवडतं गीत गात होता. नित्यक्रम होता हा त्याचा. गाणं संपलं आणि त्याचवेळीं बाहेर कांहीं तरी पडल्याचा आवाज झाला. चटकन् उठून त्यानें खिडकींतून बाहेर पाहिलं. अंधारांत कांहींच स्पष्ट दिसत नव्हतं. तो बाहेर आला आणि आश्चर्यानं त्याच्या तोंडून शब्दच उमटेना.

कशाला तरी अडखळून सुलोचना जमिनीवर जोरानें आपटली होती. स्वतःला सावरून तो पुढें झाला; सुलोचनेच्या हाताला धरून त्यानें तिला उभी केली. तिचा हात धरून तो तिला तिच्या निवासस्थानाकडे पोहोंच-विण्यास निघाला.

" इतक्या रात्रीं इकडे कुठें आली होतीस सुलोचना ? " त्याचा आवाज इतका रुक्ष आणि जड येत होता की सुलोचनेला शंका आली असावी— ' हा कोणाचा आवाज ? ' पुन्हा विरागनें तोच प्रश्न केला.

" अं—अं उगीच सहजच—"

" सहजच ?—काय अर्थ ह्याचा ? स्पष्ट सारं सांग. "

" आपलं गाणं ऐकण्यासाठीं—"

" सारा दिवस मी गात असतों. मग इतक्या रात्रीं येऊन—"

" पण हें गाणं दिवसा कधींच गात नाहीं तुम्ही आणि हेंच गाणं मला फार फार आवडतं. "

" म्हणजे तूं रोज इकडे येऊन गाणं ऐकतेस ? "

" ना—नाहीं कधीं—आज आजच—"

विरागला सारं कांहीं कळून चुकलं होतं. दोघंही निमूटपणें चालूं लागलीं. तिच्या खोलीजवळ येतांच विराग थांबला.

" रागवलांत विराग ? "

विरागनं कांहींच उत्तर दिलं नाहीं.

" विराग—विराग, रागवलात माझ्यावर—" विराग हंसला. बऱ्याच मोठ्यानं हंसला. आणि मग तिच्या पाठीवर त्यानें हलकेच थोपटल्यासारखं केलं.

" वेडी कुठली, आपल्या धाकट्या बहिणीवर का कधीं मोठा भाऊ रागावतो ! जा आतां. नीज स्वस्थ. "

विराग परतला.

" विराग—"

विराग थांबला पण त्यानें मागें वळून पाहिलं नाहीं.

" विराग, विरागभय्या क्षमा करा मला. पुन्हा कधींही नाहीं येणार मी. "

त्या तशा अंधारांत—आंधळी असूनही सुलोचना खोलीत धावली, सारी रात्र उशीवर डोळ्यातले अश्रू टपकत होते.

आकाशांतल्या नक्षत्राकडे पहात विराग कितीतरी वेळ खिडकीच्या गजाना धरून उभा होता.

# १७

"एका कर्तबगार, हुशार तरुणाचं आयुष्य तुझ्या हातांत आहे मंगल."

"पण काका, माझ्यापेक्षां लाखोपटीनं चांगली पत्नी सहज मिळेल त्यांना. माझ्याबद्दलच त्यांना इतकं कां वाटावं ?"

"तूंच विचारते आहेस हा प्रश्न मला ? मंगल, प्रत्यक्ष डोळ्यानें न पहातां नुसत्या थोड्याशा सहवासानें..."

पुढचे शब्द ऐकण असह्य वाटलं म्हणूनच कीं काय मंगलनं जगूकाकांना मध्येंच अडवलं—

"तसं नाहीं काका. पण माझ्यामुळें दुसऱ्या जीवाला त्रासच झाला तर..."

"ज्या गोष्टी माणसाच्या हातांत आहेत त्याबद्दल तरी निदान साशंक राहूं नये माणसानं. त्या जिवाला सुख देणं किंवा दुःख देणं सर्वस्वी तुझ्याच हातांत आहे मंगल. तुझ्या एका उत्साहाच्या, प्रेमाच्या शब्दासाठीं भुकेलेल्या त्या तरुणाचा विचार कर, बाप्पांचा विचार—मिनीचा विचार कर आणि स्वतःचाही विचार कर. एका तरुणाच्या अन् त्याबरोबरच स्वतःच्याही आयुष्याला पूर्णता आण. तुला आजवर अनेकदां सांगत आलों आहे, मी स्वतःसाठीं जगण्यांत..."

पण जगूकाकांचे शब्द मंगलला ऐकूं जात होते, किंवा नाहीं कोणास ठाऊक. ती स्वतःशींच पुटपुटत होती—

" बाप्पा सुखी होतील. मिनी—निदान तिला सुखी करण्यासाठीं तरी लवकरच—"

आणि मग चटकन् जगूकाकांकडे वळून तिनें एका दमांत विचारलें—

" काका, मी लग्न केलं तर बाप्पांना आनंद होईल—मिनीला आनंद होईल—तुम्हाला आनंद होईल ? "

" होय मंगल, नुसता आनंद नव्हे—अत्यानंद होईल आम्हां सर्वांना. स्वतः सुखी होशील आणि आम्हांलाही—"

" बाप्पांना सांगा, त्यांच्या इच्छेबाहेर मी नाहीं. आणि काका, त्यांना सांगा—मी तयार आहें ! "

मंगलनं डोळे मिटले, तिला बराच थकवा आला असावा. कोचाच्या हातावर तिनं डोकं टेकलं.

आणि मंगलच्या जिवाची ओढाताण जगूकाकांना कळत का नव्हती ? पण इलाज नव्हता.

प्लेगचं इनॉक्युलेशन करून घेतांना माणसाला क्षणभर त्रास होतो खरा पण पुढच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनें तो त्रास सहन करणं भाग असतं.

दाराबाहेर जगूकाकांची वाट पहात उभ्या असलेल्या बाप्पांच्या पाठीवर जगूकाकांनीं हळूच थाप मारली. दोघाची दृष्टादृष्ट झाली. जगूकाकांच्या ओंठावरचं तें हास्य आणि डोळ्यातले अश्रू—बाप्पाना सारं कळून चुकलं. थरथरत्या हातांनीं बाप्पांनीं जगूकाकाचे हात घट्ट धरले—" जगदीश. "

बाहेरून धावत येणारी मिनी त्या दोघाना त्या तशा स्थितींत पाहून पायरीवरच थबकली.

" बाप्पा,—काका. "

" मिनी—बेटा "—दोघांच्याही तोंडून एकदमच शब्द बाहेर पडले. दोघांनीं एकमेकांकडे पाहिलं—ती बातमी मिनीला कोणी सांगायची हेंच ठरवलं असावं त्या दोघानीं. जगूकाकांनीं चटकन डोळयांच्या कडा पुसल्या.

" फार फार आनंदाची बातमी आहे पोरी, आहेस कुठें ? "

" हो आणि म्हणूनच तुम्ही रडतां आहांत वाटतं काका. एका विद्वानाचं मत आहे बाप्पा—ठाऊक आहे तुम्हांला ? तो म्हणतो जेव्हां हंसण्यासारखं कांहीं होईल तेव्हां माणसानं जुन्या दुःखदायक आठवणी काढून रडावं आणि

जेव्हां रडण्यासारखा प्रसंग ओढवेल तेव्हां सुखद आठवणी काढून हसावं. आमचे काका त्या विद्वानाचे अनुयायी—"

जगूकाकांनीं मिनीचे कान पकडले.

" मिनी, ऐक तर, खरं. "—आज जगूकाका मिनीहूनही लहान झाले होते. मिनीच्या कानांत जगूकाकांनीं तें गोड गुपीत सांगितलं. मिनीचे डोळे आश्चर्यानें विस्फारले.—

" बाप्पा ? " खात्री करून घेण्यासाठीं ती बाप्पांच्याकडे वळली. हो ! काय नेम सांगावा—ऑगस्ट महिन्याच्या १६ तारखेला ' एप्रील फूल ' करण्याची लहर यायची काकांना !

" खरं आहे बेटा. आता लवकरच आपल्या आक्काचं लग्न. "

" आक्काचं लग्न—आमच्या आक्काचं लग्न—आमच्या आक्काचं लगीन."

झालं ! शब्द जुळले—चाल पण लागली. मिनी आंत धांवली. आणि लगेच बाहेर आली. मुख्य तेंच विचारायचं राहिलं होतं कीं !

" पण बाप्पा, कोणाशीं ? "

" अग तूं..." पण जगूकाका बाप्पांना थोडंच बोलूं देणार ?

" माझा एक मित्र आहे पुण्याला. त्याच्याच मुलाशीं ठरलं आपल्या आक्काचं लग्न. फार मोठा विद्वान..."

सारं कांहीं शांतपणें ऐकून घेईल तर ती मिनी कसली ! ती लगेच आंत धांवली. जगूकाका बाप्पांना हलक्या आवाजांत सांगत होते—फार खट्याळ आहे पोर. उद्यां एकदमच पाहूं दे तिला—चांगलीच गंमत उडेल. आम्हां म्हाताऱ्यांची वाटेल तशी थट्टा करायला हवी नाहीं का—पाहूं या उद्यांची गंमत. "

आणि उद्यां कशी गंमत उडेल ह्या कल्पनेनें दोघेही हसूं लागले.

साऱ्या घरभर मिनी धांवत होती—सर्वांना सांगत होती—

" आक्काचं लगीन—माझ्या आक्काचं लगीन—वऱ्हाडी कोण कोण जाणार—? आमच्या आक्काचं लगीन—"

आणि पहातां पहातां म्हातारा सदूमाळी, स्वयंपाकी विठू, भिकू, गणू, ड्रायव्हर, राधा मोलकरीण—खूपच वऱ्हाडी मंडळी जमली कीं तिच्या

भोंवतीं. मिनीनं सर्वांना लग्नाला नेण्याचं वचन दिलं. आता उरली फक्त आक्का.

मिनी आक्काच्या खोलींत धावली—

"आक्काच लगीन—वऱ्हाडी कोण कोण जाणार ? अंहं ! नाहीं आक्काला नेणार."

"मिनी—मिनी "

बापरे ! किती मोठ्यानं ओरडला हा किशोर ! पटलं नसावं त्याला तें मिनीचं गाणं. नाहीं तरी पहिल्यापासूनच मिनीचं नि त्याचं जरा वाकडंच, हो ! उगाचच खट्याळ मिनी त्याला वेडावून दाखवी. आत्ताही तिनं त्याला वेडावून दाखवलंच आणि आक्काला शोधण्यासाठीं बागेंत धावली.

# १८

दुसरे दिवशीं सकाळीं कॉलेजला निघालेल्या मिनीला जगूकाका बजावून सांगत होते—

" मिनी, आज दुपारीं चार वाजतां आपल्याकडे फार मोठे पाहुणे येणार आहेत. आहे ना लक्षात ? "

" बरोबर तीन वाजतां येतें मी काका. "

आणि तीन वाजतां परत येण्याचं आश्वासन देऊन गेलेल्या मिनीचा साडेचार वाजून गेले तरी पत्ता नव्हता. जगूकाका आलेल्या पाहुण्यांना सांगत होते—" ही आमची मिनी अशी आहे. काळ, वेळ, छोकरीला कसलं बंधन म्हणून नाहीं. आजच पहाना बरोबर तीन वाजतां येतें म्हणून सांगून गेली आणि अजून पत्ता......"

फाटकांत मोटरचा हॉर्न वाजला.

" आली वाटतं मिनी—" आणि लगेच जगूकाका खिडकींत लगबगीनें गेलेसुद्धां. पायऱ्या चढतां चढतां वर पहाणाऱ्या मिनीला जगूकाका खुणवीत होते—

" लवकर ये पोरी—ते आले आहेत ना. " एक एक-मधें मधें दोन दोन पायऱ्या सोडीतच मिनी वर धावली, अणि तिची नजर अचुक गेली, ती पाहुण्यांच्या वरच ! जवळच्या भिंतीचा तिनें आधार घेतला. जिन्यावरून धापा टाकीत येणाऱ्या मिनीचा श्वास कोंडला गेला.

" कशी झाली एका मुलीची गंमत—" जगूकाका हसूं लागले. बाप्पांनीं पण स्मित केल. " हं या म्हटलं मीनाताई—बसा इकडे. "

पण मिनी जागची हालली नाहीं. जगू काकांचे शब्द तिच्या कानापर्यंत पोहोंचलेच नसावेत. सारीं गात्रं बधीर झालेलीं.

जगूकाका पुन्हा म्हणत होते—

" अशी काय वेंधळ्यासारखी उभी आहेस—बैस ना इकडे येऊन. ओळख नाहीं का करून घ्यायची पाहुण्यांच्या बरोबर ? "

आलेल्या परिस्थितीला तोंड देण्याची सुप्त शक्ती निसर्गानं प्रत्येक प्राणिमात्रांना दिली आहे हेंच खरं—नाहींपेक्षा इंसऱ्या, अल्लड मिनीला इतक्या लवकर आणि इतक्या सहजासहजी स्वतःला कसं सावरतां आलं असतं ?

" ही आमची मिनी—नव्हे—नव्हे—मिनाक्षी देसाई. आपण प्राध्यापक आहांत त्याच कॉलेजमध्यें आमच्या मिनाताई पण बी. ए. च्या वर्गात शिकत असतात. तुम्ही पाहिलं नसेल कधीं तिला कॉलेजमध्यें. अति लाजाळू आहे ती. कुठेंतरी कोपऱ्यांत खालीं मान घालून—"

" हो तर कोपऱ्यांत बसून खोड्या करणाऱ्या खोडकर—आपल्याच भाषेंत बोलायचं तर—लाजाळू मुलांच्या यादींत यांचं नांव अगदीं अग्रभागीं आहे. "—अगदीं क्वचित विनोद करणारे अविनाश मध्येंच बोलले.

बाप्पा, काका हंसूं लागले. इतका वेळ मधल्या फुलदाणीवर खिळवलेली नजर हळूच वर करून मंगल पण हंसूं लागली. आणि मिनी ? तिचा तर सारा जन्मच हंसण्यांत गेलेला. अकारण हंसत रहाणारी मिनी आत्तांच हंसल्यावाचून कशी राहील ?

चहा तयार करण्यासाठीं मंगल उठली. एरवीं तासनतास कसलीही हालचाल न करता जागच्या जागीं बसून रहाणारी मंगल—पण आज तिच्या हालचालींत बराच जिवंतपणा दिसत होता. मग तो आपोआपच आला होता कीं ओढून ताणून आणला होता—तिचं तिलाच माहित !

आणि एक क्षणहि एका ठिकाणीं स्वस्थ न बसणारी मिनी मात्र आज स्वतःला कसली हालचाल करतां येते हेंच विसरून गेली होती.

हाताला खुर्चीचा आणि कपाळाला हाताचा आधार देऊन मिनी बसली होती. आजूबाजूला काय चाललं आहे हें पण तिला जाणवत नसावं.

एरवीं सतत बडबड करणारीं माणसं अवेळीं स्तब्ध झालीं कीं ती स्तब्धता इतरांना चांगलीच जाणवते. जगूकाकांना ती मुग्धता चटकन जाणवली. " का ग, गप्प आहेस आज ? डोकं बिकं दुखतंय कीं काय ? चेहेरा जरा उतरल्या.... "

कपांत चहा ओततां ओततांच मंगलनें मिनीकडे पाहिलं. खरंच की किती कोमेजला होता मिनीचा चेहेरा !

चटकन् मंगलनें हातांतली चहादाणी खालीं ठेवली. मिनीजवळ जाऊन तिच्या कपाळावर हात टेकला.

" छे ग ! ताप कसला येणार तिला. दिवसभर उन्हांत हुदड्या मारल्या असतील —"

" हो. भर उन्हांत क्लास चुकवून ब्याडमिंटन खेळताना मी त्यांना रोजच पहातों. "

" ऐकलंस ? " बाप्पा मंगलला म्हणत होते. " आणि तुला वाटतं तुझी मिनी फार अभ्यास करते. " बिचारी मिना ! एक दिवस तरी कधीं तिनें प्रो. अविनाशांच्या लेक्चरला बुट्टी मारली होती का ? त्या लेक्चरसाठींच तर जात होती ती कॉलेजमध्यें ! " आणि काय हो, तुमच्या कॉलेजचा खरा टाईम कोणता ? "

जगूकाकाच्या प्रश्नांतली खोंच लक्षांत न येऊन प्रो. अविनाशनीं विचारलं.

" म्हणजे ? "

" अहो, म्हणजे तुमचं कॉलेज सकाळीं केव्हां उघडतं आणि केव्हां बंद होतं ? आमची मिनी बहुतेक कॉलेजचें कुलूप काढण्यासाठीं आणि परत लावण्यासाठीं—"

काका मध्येंच थाबले. मिनीचं डोकं बरंच दुखत असावं. तिनें कपाळ अगदीं घट्ट दाबून धरलं होतं.

" बेटा, फार दुखतंय डोकं ? "

मिनीनें अर्थशून्य मान हालवली.

" थोडा वेळ डोळे मिटून स्वस्थ पडून रहा म्हणजे बरं वाटेल जरा. "

आयुष्यांत आज प्रथमच मिनी आज्ञाधारक, शहाण्या मुलीसारखी वागली खरी.

ती कळसुत्री बाहुलीप्रमाणें उठली आणि आंत निघून गेली. जातांना पाहुण्यांना नमस्कारही केला नाहीं. त्यांच्याकडे नुसतं पाहिलंही नाहीं.

इतका वेळ कसा तरी सावरून धरलेला तोल खोलींत पाऊल टाकतांच सुटला. ती कशीतरी कॉटपर्यंत गेली, आणि त्यावर आंग टाकून दिलं.

इतके दिवस मिनी स्वतःलाच जग समजून स्वतःभोंवतीं फिरत होती. आज सारं जग तिच्याभोंवतीं फिरूं लागलं.

बाहेर जगूकाकांनीं कांहींतरी विनोद केला --बहुतेक मिनीवरच आधारलेला असणार तो. आणि मग सर्वच हसूं लागलीं.

मिनीनें डोळे घट्ट मिटून घेतले. उंच डोंगरावरून खोल दरींत पडत असल्याचा भास तिला होत होता—

# १९

आणि कशी कोणास ठाऊक दुसरे दिवशीं सकाळीं मिनी कॉलेजला पोहों-चण्याच्या आधींच ती बातमी सबंध कॉलेजमध्यें पसरली.

थिएटरमध्यें मंगलनें म्हटलेलं गाणं—आणि त्यानंतर रेडियोंत होणारे तिचे कार्यक्रम—आजुबाजूच्या जगात एक उत्तम गायिका म्हणून मंगलचा लौकिक झाला होता. आणि कॉलेजच्या मुलांची तर ती गानदेवताच बनली होती. आणि त्यांच्या आवडत्या गायिकेचें लग्न त्यांच्याच प्रो. अविनाश-बरोबर ठरलेलं—कॉलेजचीच पोरं तीं! आज प्रो. अविनाशना पाहून कोणाला डांग्या खोकल्याची उबळ येत होती तर कोणाचा घसाच खवखवत होता. कांहीं मुलें त्यांच्याकडे पाहून नुसतींच मिस्कीलपणें हंसत होतीं. तर कांहीं धीटपणें पुढें होऊन त्यांचें अभिनंदन करीत होतीं. लेडीज रूममध्यें तर आज हंसण्या, कुजबुजण्याला ऊतच आला होता. आणि एरवीं गंभीर प्रकृतीचे अविनाशही स्मित मुखानें ह्या साऱ्या गोष्टींचा स्वीकार करीत होते.

आज रोजच्यापेक्षा जरा उशीरांच आली मिनी कॉलेजला. तिची मोटार फाटकांत दिसतांच कांहीं मुली पुढें धांवल्या. मोटारचें दार उघडून जवळ जवळ मिनीला बाहेर आढीतच शाती म्हणत होती—"Congratulation मिनी—" मिनी चमकली.

"पाहातां पाहाता कसा छान नवरा शोधलास कीं बहिणीसाठीं—आतां लग्नांत काय पटकवणार ग त्यांच्याकडून?"

मिनीची आवडती मैत्रिण धांवतच तिच्याकडे आली—

"इश्श! किती लबाड आहेस ग मिनी तूं—पत्तासुद्धां लागूं दिला

नाहींस—तुझ्या आक्कासाठीं का ते वर्गात त्यांचे फोटो काढणं चालत होतं तुझं ?—इश्श मला आपलं वाटत होतं—"

मिनीच्या कानाजवळ तोंड नेऊन ती पुटपुटली—"मला आपलं वाटलं तुझंच त्यांच्यावर प्रेम आहे."

आणि गोखल्यांची सुधा मिनीला गदगदा हालवून म्हणत होती—"दाखव ना ग प्रो. अविनाश कसे बोलतात तुझ्या आक्काशीं ते. असेच गंभीर राहून, कपाळाला मधोमध एक सुरेखशी आठी घालून चष्म्याच्या-वरून पहात बोलतात कीं, चष्मा हातांत घेऊन तुझ्या आक्काकडे पहात... इश्श ! अशी ग काय वेंधळ्यासारखी उभी आहेस ? दाखव ना ग—कशी छान नक्कल करतेस तूं त्यांची..."

आणि मिनी ? स्वत:लाच न कळत वरवर हसत होती, कांहींतरी बडबडत होती. वर्गात मिनीच्या मागें बसलेला तो मुलगा म्हणत होता—"अरे, आज लॉजिकच्या तासाला खरी मजा येणार—" पण आज प्रो. अविनाशच्या लेक्चरला न थांबतांच मिनी घरीं निघून आली. दारातच तिच्या आक्कानें तिला हटकलं—

"मिनी, आज इतक्या लवकर ?"

"डोकं दुखतंय ग आक्का आज."

आक्काकडे न पहातां मिनी आपल्या खोलींत निघून गेली.

तोंडावर उशी घट्ट धरून मिनी पडली होती. अगदीं हलक्या पाऊलांनीं मंगल खोलींत आली. हळूच तिच्या तोंडावरची उशी दूर केली—मिनी रडत होती ! मिनीच्या डोळ्यांत आणि अश्रू ? केवढा धक्का बसला असता तिच्या आक्काला एरवीं ! पण आज...

तिची आक्का किंचित हसून म्हणत होती—"वेडी कुठली ! जरा कुठें डोकं दुखलं म्हणून कोणी रडत बसतं वाटतं ?· अगदीं कुक्कुलं बाळ आहे आमची मिनी—"

तिची मिनी लहान बाळ होती कीं मंगललाच कसली तरी भुरळ पडली होती ?

कांहीं तरी अनिष्ट करण्यापूर्वी 'काळ' माणसाला 'काळ झोंप' आणतो म्हणे—तशीच काळ झोंप—काळ धुंदी आक्काच्या डोळ्यांवर नव्हती ना आली !

# २०

" प्रकृती बरी नाहीं का आपली ? "—बोलतां बोलतां मध्येंच थांबून पाहुण्यांनीं विरागला विचारलं.

" छे ! तसं कांहीं नाहीं. "

नाना गुरुजींनीं विरागकडे पाहिलं. चांगलाच काळवंडला होता तो.

" छे—नाहीं कसं काहीं तरी होतंय विराग तुम्हांला—"

" जरा डोकं दुखतंय—"

" तुम्हांला हजारदां सांगितलं विराग पण ऐकत नाहीं तुम्ही. " आणि मग गुरुजींनीं आपली तक्रार पाहुण्यापुढें मांडली.

" तुम्हींच पहा. सकाळपासून रात्रीं झोपेपर्यंत सारखं काम करीत असतात हे आमचे विरागभय्या. विश्रान्ती कशी ती ठाऊकच नाहीं ह्या भल्या गृहस्थाला. प्रकृतीवर परिणाम झाल्यावांचून कसा राहील ! आश्रमांत हे आले तेव्हां प्रकृती कशी छान होती आणि आतां पहा नुसतीं हाडं—तें कांहीं नाहीं विराग, तुमचं कांहीं एक ऐकून घ्यायला तयार नाहीं मी. आतां जाऊन स्वस्थ निजून रहा आणि हें पहा दोन दिवस बिलकूल काम करायचं नाहीं. पूर्ण विश्रान्ती मिळाली पाहिजे तुम्हांला—हं चला उठा. "

आलेल्या पाहुण्यांना नमस्कार करून विराग खोलीबाहेर पडला. कसला तरी संशय येऊन चटकन् गुरुजी उठून खिडकीजवळ गेले. आलेला संशय

खरा ठरला. आश्रमाच्या फाटकाबाहेर जाणाऱ्या विरागकडे पहात गुरुजी म्हणत होते—

" पाहिलंत—खोलींत जाऊन स्वस्थ पडण्याऐवजीं हा भला गृहस्थ अशा भर उन्हांत भटकायला निघाला. काय म्हणावं आतां ह्याला ? "

आणि विरागलाही तेंच समजत नव्हतं—' काय म्हणावं आपल्या ह्या दुबळ्या मनाला ? ' ही गोष्ट केव्हाना केव्हांतरी घडणारच हें त्याला माहित होतं. त्यासाठीं—त्या प्रसंगाला शांतपणें तोंड देण्यासाठीं त्यानें आपल्या मनाला पूर्ण तयार करून ठेवलं होतं—निदान त्याला तसं वाटत होतं. पण आज ? तो नुसता भ्रमच ठरला.

त्याचं त्यालाच कळत नव्हतं—हे असले प्रसंग घडतातच का आपल्या आयुष्यांत ? आजच पहा ना. सहजच नागपूरला आलेल्या त्या गृहस्थाला मुद्दाम १०० मैल दूर येऊन हा आश्रम पहाण्याचीच इच्छा कां व्हावी ? दुसरीं कमी का होतीं प्रेक्षणीय ठिकाणं नागपूरच्या आसपास ?

पण तें सारंसारं सोडून तो भला गृहस्थ थेट इथेंच येऊन पोहोंचला. बरं तो गृहस्थ तरी एकादा क्लार्क, शाळामास्तर, फार तर डॉक्टर नाहीं तर एकादा श्रीमंत व्यापारी असता तर ? पण जें नव्हतंच तें घडणार कुठून ? तो गृहस्थ होता ऑल इंडिया रेडियोच्या संगीत विभागाचा डायरेक्टर. मग तो डॉक्टर, मास्तर किंवा क्लार्क बनणार कसा ?

आणि असल्या बड्या पाहुण्याची —त्यांतून संगीतज्ञ रसीक कलावंताबरोबर विरागची ओळख करून घ्यायला गुरुजी तरी कसे चुकतील ? विराग तर त्यांच्या आश्रमाचा प्राण !

बरं. एवढ्यावरच तरी कुठं थांबलं ! विराग, गुरुजी आणि पाहुणे यांच्या गप्पा चालू असतांनाच छोटा आनंद तेथें येऊन काहीं एक न बोलतां गप्प उभा राहिला. विरागनीं तरी गप्प रहायचं ? पण छे ! त्यानं विचारलंच—

" काय आनंद, काय हवं आहे तुला ? "

" आपल्या आश्रमात आज सकाळीं मुंबईचे पाहुणे आले आहेत ना—त्यांना मला भेटायचंय. "

सात वर्षाचा छोटा आनंद—त्याचं काय काम होतं त्या बड्या पाहुण्याच्याकडे ?

" काय काम आहे त्यांच्याजवळ तुझं ? " जराशा कौतुकानेंच गुरुजीनीं त्याला विचारालं.

" ते कीं नाहीं रेडियोंत म्हणे खूप मोठे आहेत. आपल्या आश्रमात गुरुजी, तुम्हीं आहांत ना तसेच म्हणे तेथें ते हेडमास्तर—" सगळींच हसूं लागलीं. कांहीं तरी चुकलं आपलं ह्या जाणिवेनं आनंदानें चटकन जीभ बाहेर काढली.

" तुला रे हें सारं कुणी सांगितलं ? "

अनोळखी आवाज पाहुण्यांचाच आहे. कसं चटकन् ओळखलं आनंदनं. आणि मग आवाजाच्या अनुरोधानें आनंद त्यांच्या जरा जवळ गेला.

" तुम्हींच ना हो ते...ते..."

" हो हो मीच बरं का तो रेडियो मास्तर. "

आनंद खुदकन् हंसला.

" सुलोचनाताई म्हणत होती कीं..."

पाहुण्यानीं मध्येंच विचारलें—" कोण ही सुलोचनाताई ? "

आणि मग गुरुजींनीं खुलासा केला—

" आज सकाळीं ज्या मुलीचं गाणं आपण ऐकलंत—"

" हो तीच बरं का आमची सुलोचनाताई. गाते कशी छान—"

मध्येंच आनंदनीं जीभ चावली. एका मोठ्या रेडियोमास्तर बरोबर बोलत असल्याची जाणीव त्याला झाली असावी. आणि मग तो झटपट मूळ मुद्यावर आला—

" पुढच्या महिन्यांत तुम्हीं तिला रेडियोंत गाणं म्हणायला घेऊन जाणार ? "

अस्सं होय !—आतां सर्वांच्या लक्षांत आलं आनंदचं पाहुण्याजवळचं काम. स्वारीला रेडियोंत गाण्याची इच्छा—

" पण काय रे तुला गातां येतं का ? "

आणि पाहुण्यांच्या प्रश्नांतली खोंच लक्षांत घेऊन आनंदनीं चटकन् खुलासा केला—

" छट् ! मला गाण्यासाठीं रेडियोंत नाहीं कांहीं यायचं—"

" मग रे कशासाठीं येणार आहेस तूं तिथं ? " —जरा आश्चर्यानेंच पाहुण्यांनीं विचारलं.

"तुमच्या रेडियोंत त्या मंगलादेवी येतात ना गाणं म्हणायला ? त्या मंगलादेवींना पहायचंय मला. मग जाल का हो घेऊन मला ?"

गुरुजी, पाहुणे आणि विरागसुद्धां—तिघेही हंसले.

आनंदाला ठाऊक असावं—लहान मुलाची एकादी मागणी पुरी करायची नसली म्हणजे मोठीं माणसं ती गोष्ट अशीच हंसण्यावारी नेतात. आणि मग जास्तच चिकाटीनें तो पाहुण्यांच्या मागें लागला.—

"मग सांगा ना हो—जाल ना घेऊन मला ? येऊं ना मी सुलोचनाताई-बरोबर. मी मुळींच त्रास देणार नाहीं तुम्हांला—सुलोचनाताईशीं सुद्धां भांडणार नाहीं मी. मग येऊं ना मी तुमच्या रेडियोंत ?"

"अरे पण उपयोग काय तेथें येऊन ? तूं हा असा आंधळा. तूं रे कसा पाहाणार मंगलादेवींना ?"

मंगलादेवीला पाहाण्याच्या कल्पनेंत स्वतःचं अंधत्व विसरणारा आनंद—कल्पनेच्या साम्राज्यात उंच उंच भरारी मारणारं त्याचं बाल मन क्षणार्धात आकाशातून पृथ्वीवर आदळल. त्याचा चेहेरा खर्कन् उतरला. पाहुण्यांनीं न कळत त्या बालमनावर घातलेला घाव गुरुजींना जाणवल्यावांचून कसा राहील ?

"अहो, तुमच्या लक्षात नाहीं आलं आमच्या आनंदचं म्हणणं. त्याला तुमच्या मंगलादेवींना भेटायचंय—त्यांच्याशीं बोलायचं आहे, खूपखूप गप्पा मारायच्या आहेत आणि त्यांचं गाणं पण ऐकायचं आहे. हो ना रे आनंद ?"

तें बालमन चटकन् पुन्हा फुललं—

"त्यांचीं गाणीं की नई मला फार फार आवडतात. पण आमचे विराग-भय्या शिकवीतच नाहींत मुळीं मंगलादेवींचीं गाणीं आम्हांला—"

गाल खूपच फुगवून आनंद बोटें मोजू लागला—"एकदां, दोनदां, तीनदा, पांचदा सांगितलें मी त्यांना पण भय्या शिकवीतच नाहींत मला तीं गाणीं. ते म्हणतात त्यांना गाण्याचे शब्द नाहींत ठाऊक पण मला येतात हो शब्द—पण चालच येत नाहीं. आणि चालसुद्धां सांगत नाहींत हो आम्हांला—सुलोचनाताईंना सुद्धां..."

आणि आनंदची ही फिर्याद अशीच कितीतरी वेळ लांबली असती. पाहुण्यांनीं मध्येंच पडून तडजोड करण्याचा प्रयत्न केला—

" असं हो काय विरागभय्या. आनंदला मंगलादेवीचीं चुटकीसरशीं गाणीं शिकवलीं पाहिजेत तुम्हीं. तुम्हाला येत नसतील तर मुद्दाम मुंबईला आठ दिवस येऊन मंगलादेवींजवळ तीं गाणीं शिका आणि मग आनंदला शिकवा. बरं का आनंद, आता विरागभय्या नक्कीच शिकवतील तीं गाणीं तुला. आणि मग ये तूं मुंबईला. "

" हो खरंच—" आनंदला पाहुण्यांचं म्हणणं एकदम पटलं—

" मग त्यांना मी त्यांचीं गाणीं म्हणून दाखवीन—"

" हो आणि मग तुझीं गाणीं ऐकल्यावर मंगलादेवी अगदीं खूष होतील तुझ्यावर. "

" पण—पण गाणीं शिकल्यावर मला घेऊन जाल ना मुंबईला ? अगदीं नक्की ? "

" अगदीं नक्की घेऊन जाईन" पाहुण्यांनीं आनंदाच्या हातावर नाहीं पण पाठीवर हात मारून आश्वासन दिलं.

मोठीं माणसं खोटं कधींच बोलत नाहींत ह्या अढळ विश्वासावर जगणारा आनंद—आपल्या सोबत्यांना ती खबर देण्यासाठीं निघून गेला.

" हुशार दिसतो आहे छोकरा. गाण्याचाही बराच नाद दिसतो आहे स्वारीला. "

" तें कांहीं विचारूं नका. आणि त्यांतून त्या तुमच्या मंगला देसाईनं तर नुसतं वेड लावलं आहे त्याला. "

" अहो, त्यालाच काय हजारों माणसांना वेड लावलं आहे तिनं. बाकी आवाज जसा गोड आहे तशीच स्वभावानें पण गोड आहे. आणि नवरा पण तसाच—" नसती माहिती पाहुणे गुरुजींना पुरवीत होते.

" लग्न झालं आहे म्हणायचं तिचं ? "

—आणि गुरुजींना तरी काय करायचं होतं तिच्या लग्नाशीं ?

" झालं नाहीं. होईल आतां लवकरच—हा महिना अखेर. तो मुंबईत-ल्याच एका कॉलेजमध्यें प्रोफेसर आहे—फार विद्वान्, भला माणूस—"

आणि बोलतां बोलतांच विरागकडे लक्ष जाऊन त्यांनीं तो सुरवातीचा प्रश्न केला होता.

काय द्यावं नांव आतां ह्या प्रसंगाला ? स्वतःवरच चिडला होता विराग आज. नाहीं तरी कुणावर चिडणार ?

कां ? कां ? कां घडतात ह्या साऱ्या गोष्टी ?

गोड गोड बोलून सर्वांना आनंद देणारा हा आनंद कशाला आला नेमका त्याचवेळीं तिथें ? तशीच ती सुलोचना. आश्रमांत दुसरे आहेतच कीं शिक्षक. पण तिचीही ओढ माझ्याच ... कां ? कां घडावं हें असं ?

सारं सारं कसं सहज घडून जातं. क्षुल्लक दिसणारी ठिणगी अनेकांचे प्राण घेते. तसलेच हे प्रसंग. यालाच म्हणायचं का दैव ?

उंदराला छळून छळून मारणाऱ्या माजरा सारखंच असतं का हें दैव ! कसला हा घातकी खेळ ! कांहींच का उद्योग नाहीं त्या दैवाला कीं देवाला !

एकाही प्रश्नाचें उत्तर त्याला मिळत नव्हतं आणि इतक्यांत तें मिळणारही नव्हतं. अजून कितीतरी चमत्कार त्याचें दैव त्याला करून दाखविणार होतं.

आत्तां कुठं सुरवात झाली होती !

# २१

सारं सारं संपलं होतं. स्वतःभोंवतींच गिरक्या घेणाऱ्या मिनीला आतां चांगलीच भोंवळ आली होती. आजूबाजूचं कांहींच दिसत नव्हतं. आणि आतां तिला जगांतलं एक कटु सत्य कळून चुकलं—कल्पनेच्या साम्राज्यांत इतकं फाजिल वावरणं चांगलं नाहीं. पण व्हायचं तें आधींच होऊन चुकलं होतं.

माणसाची दिशाभूल कधींही होऊं नये पण ती हटकून होते. कल्पनेच्या साम्राज्यांत तिनें खूप खूप उंच—अगदीं गगनचुंबित मनोरा उभारला. त्या सुंदर मनोऱ्यांत तिला आवडणाऱ्या त्या मूर्तीची स्थापना केली. त्या मूर्तीपुढें तो प्रेमवेडा जीव सतत प्रेम—गीत गात होता—स्वतःच तल्लीन होऊन नाचत होता. त्या जीवाची त्या मूर्तीवरची भक्ती अढळ होती—प्रेम बलवान होतं पण ! पण—कालचक्राची गती त्या प्रेमाहून अधिक बलवान होती.

दगडाच्या देवाची कोणीही पूजा करावी, आपल्या भक्तीनें, प्रेमानें स्वतःला त्याच्या ठिकाणीं बांधून घ्यावं—दगडाचाच देव ! कशालाच कधीं तो प्रतिकार करीत नाहीं. मिनीचं चुकलं तें इथंच. मिनीचा देव, तिच्या प्रीतीचा परमेश्वर दगडाचा नव्हता. चांगला हाडामासाचा होता. आणि म्हणूनच हृदयाच्या देव्हाऱ्यांत त्याची प्राणप्रतिष्ठा करण्यापूर्वी तिनें त्याची संमति घ्यायला हवी होती.

उगीच का मिनीची आक्का मिनीला वेडी म्हणत होती ? व्यवहारी जगां-

तला हा साधा सरळ मार्ग मिनीला दिसला नाहीं. आणि शेवटीं व्हायचं तेंच झालं.

मिनी हसत नव्हती, गात नव्हती, नाचत नव्हती आणि बोलतही नव्हती. अजूनही आपण जिवन्त कसे राहिलों आहोंत ? हेंच एक कोडं तिला पडलं असाव.

वेडी मिनी ! निराशेच्या एका धक्यानें कांहीं कुणी मरत नाहीं.

तिची आक्का—लहान का होता तो निराशेचा धक्का ! पण तरीही जगली होती—जगत होती. पण अशावेळीं माणसाचं लक्ष स्वतःपलीकडे जातच नाहीं मुळीं.

त्या दिवशीं सकाळपासूनच आकाश भरून आलं होतं. सूर्योदयाच्या वेळीं सूर्यास्ताची आठवण होत होती. मिनीच्या मनावर त्या बाह्य वातावरणाचा विशेषच परिणाम झाला.

ती पुन्हा बिछान्यात जाऊन पडली. डोळे घट्ट मिटून घेतले. तिला वाटत होतं—खूप खूप झोंप यावी. जाग येऊंच नये मुळीं. आणि इतक्यांत बाहेर कसली तरी गडबड सुरू झाली. एरवी दंगा करून सारं घर डोक्यावर घेणाऱ्या मिनीला आजची ती तेवढी बडबडही सहन झाली नाहीं. उशालगतची बेल तिनं केवढ्या जोरानें दाबली ! भिवा गडी धावतच खोलींत आला.

"कायरे कसली गडबड चालविली आहे आज ही—केवढ्यांदा बोलताहेत हीं माणसं—काय झालं काय एवढं ?"

"बंगल्याला रंग देयाला बाहेरचं मजूर आणल्याती आज—"

"रंग ? परवाच तर दिवाळींत रंग दिला."

"तसं नव्हं. घरांत लगीन उभारल्यावर घराला रंग द्याया होवा. आठ दिवसावर आलया आता—दोन दिवसात .."

मिनीनें पायथ्याचा रग तोंडावर ओढला. भिवा निघून गेला.

"आठ दिवस !—सारे आठच दिवस ?—"

मिनीनें तोंडावरचा रग दूर फेकला. तिची नजर समोरच्या कॅलेंडरवर खिळली—तिच्या कानांत सनईचे सूर घुमूं लागले. बोहोल्यावर चढलेली तिची आक्का आणि अविनाश...

तडकन् ती उठून उभी राहिली. त्या खोलींत क्षणभरही थांबणं तिला असह्य झालं असावं. धावतच ती खालीं गेली. गॅरेजमधली मोटार बाहेर काढली आणि बघतां बघतां मोटार दिसेनाशी झाली.

हळूहळू आकाशांत गडगडाट वाढूं लागला. पावसाचे ते मोठमोठाले थेंब आणि तशांतच तो सोसाट्याचा वारा—बाप्पानीं बाहेर पाहिलं.

आज वादळाचं चांगलंच चिन्ह दिसत होतं. आणि त्याचवेळीं आकाशांत वीज चमकली. बाप्पा मग तेथें क्षणभरही थांबले नाहींत.

कसल्या तरी आवाजानें 'मंगलनं चमकून वर पाहिलं. बाप्पा उघडी खिडकी बंद करीत होते.

"केव्हां आलांत बाप्पा ?"

"हा आत्तांच. ह्या अशा वेळीं खिडक्या सताड उघड्या ठेवून बसली आहेस—काय म्हणावं तुला ? आणि आज ह्या मिनीला पण कसा विसर पडला खिडक्या दार बंद करण्याचा—"

"तिचाच तर विचार करीत होतें बाप्पा मी. काय झालं आहे तिला कळत नाहीं."

"कालच विचारणार होतों त्याविषयीं मी तुला. पण गडबडींत राहून गेलं. दोनतीनदां विचारलं मी तिला पण नीट कांहींच बोलत नाहीं. काय झालं आहे काय पोरीला आज काल ? तुला पण कांहीं सांगत नाहीं ?"

"पुष्कळ विचारलं तिला. पण बरं वाटत नाहीं ह्यापलीकडे कांहींच बोलत नाहीं ती. पण बाप्पा मला वाटतं—" मंगल क्षणभर घुटमळली.

"ज्या मुलावर मिनीचं प्रेम आहे—तिथं तर कसली निराशा—"

बाप्पा नुसते आश्चर्यानें पहातच राहिले. प्रेम आणि निराशा ! प्रेमाचे खेळ खेळण्याइतकी मिनी मोठी कधीं झाली ? आणि बाप्पांच्या मनातला गोंधळ ओळखून किंचित हसून मंगल सांगू लागली—

"होय बाप्पा तिच्याच कॉलेजमधल्या एका मुलावर तिचं प्रेम बसलं असावं—"

"म्हणजे नक्की असं तुला कांहींच ठाऊक नाहीं ?"

"तिनें नांव नाही सांगितलं मला. पुष्कळदा विचारलं मी तिला—"

बोलता बोलतांच मंगल थांबली. कोणाची तरी चाहूल—

दारांतून स्वयंपाकी विचारीत होता—

“ आज ताई जेवायला उशिरां येणार आहेत ? ”

“ म्हणजे ? मिनी जेवली नाहीं अजून ? ”

“ नाहीं. त्या सकाळींच मोटार घेऊन बाहेर गेल्या. अजून आल्या नाहींत. ”

“ बरोबर ड्रायव्हर—” बाप्पांच्या घशाला कोरड पडली.

“ नाहीं. एकट्याच गेल्या आहेत ताई गाडी घेऊन. ”

बाप्पा, मंगल दोघांनींही एकमेकांकडं पाहिलं. बाहेर आकाश कडाडलं— दोघांच्याही आंगावर शहारे आले.

कसल्या भयंकर वादळाचें पूर्वचिन्ह हें ! बाप्पा कांहीं न बोलतां बाहेर गेले आणि थोड्याच वेळात दुसरी मोटार फाटकाच्या बाहेर पडली. मिनी गेली त्याच्या अगदीं उलट दिशेनें बाप्पाची मोटार तिला शोधण्यासाठीं भरधांव जात होती.

आता सबंध घरांत मंगल एकटी होती. डोकं घट्ट धरून ती कितीतरी वेळ तिथेंच बसून राहिली. आणि मग कसला तरी विचार मनात येऊन ती जागचीच उठली अणि तडक मिनीच्या खोलींत गेली.

सबंध खोलीभर मंगलची नजर भिरभिरत होती. टेबलाजवळचा दिवा अजूनहि जळत होता.

“ रात्रभर मिनी जागीच होती कीं काय ? ”

आणि इतक्यांत तिची नजर टेबलाखालीं गेली. ती स्वतःशींच पुटपुटली—“ कोणाचा फोटो फाडून टाकला आहे हा इथ ? ”

मंगलनें भराभर सारे तुकडे गोळा केले. टेबलावर ते ठेऊन नीट जमविण्याचा ती प्रयत्न करूं लागली—

आणि ! आणि काय दिसलं तिला तिथं ?

ती मटकन खुर्चींत बसली. त्या अर्धवट जमवलेल्या चित्राकडे ती विस्फारित नेत्रानें पहात होती—

अगदीं तशाच नजरेनें तिची मिनी त्या अथांग समुद्राकडे पहात होती. तो घोंघावणारा वारा, समुद्रावरल्या त्या प्रचंड लाटा, त्यांतच वरून पडणाऱ्या पावसांच्या सरीवर सरी—आकाश, समुद्र, जमीन, सारं कांहीं एकच दिसत होतं.

मिनीच्या डोक्यांत उठलेलं काहूर—बाहेरच्या ह्या वादळापेक्षांही भयंकर होतं.

' कशासाठीं आणि कुणासाठीं जगायचं आतां ? आक्काकडे पहात, तिच्या सुखांत आनंद मानून रहायचं ? कसं शक्य आहे तें ! ज्याच्यावर प्राणापली-कडे प्रेम केलं त्याच्याच सहवासांत राहून मीलनाचा आनंद—नाहीं—नाहीं—शक्य नाहीं. मग ? आक्काला सारं सांगून—नको—नको—त्यापेक्षां माझ्या आक्कासाठीं सर्वस्वाचा त्याग—त्याग ! खरंच त्याग हाच मानवी धर्म आहे—काका असंच म्हणायचे—मग त्याग हाच मानवी धर्म म्हटल्यावर आत्महत्या तरी पाप कसं......"

आकाश कोसळून पडल्यासारखा कसला तरी भयंकर कडकडाट झाला. मिनीनं घाबरून वर पाहिलं. आकाशांतून प्रकाशाचा झोतच्या झोत पृथ्वीवर आला.

" आक्का—आक्का—"

" मंगल—मगल—"

दोन्ही मोटारी दोन विरुद्ध दिशेनें घराकडे धावत होत्या.

आणि मंगल !

अजूनहि ती तिथेंच खिडकीच्या गजांना घट्ट धरून उभी होती. डोळयापुढें अन्धार होता.

" आक्का—आक्का—" आक्काच्या खोलींत कोणीच नव्हतं.

मिनीनें स्वतःच्या खोलीकडे धाव घेतली—

आणि आक्काला त्या स्थितींत पहातांच तिचं भान तिच्यांत राहिलं नाहीं.

ती जोरानें किंकाळली आणि मंगलच्या गळयांत पडली—

" मिनी, राजा, आधींच का बरं तूं हें सारं मला सांगितलं नाहींस ? "

भयाकूल नजरेनें मिनीनें खोलीभर नजर टाकली. टेबलावरचे ते जुळवून ठेवलेले फोटोचे तुकडे...थरथरणाऱ्या दोन्हीं हातांत आक्काचं तोंड धरून मिनी तिच्या डोळयांत पाहूं लागली—काय होतं तिथ ? डोळयांची यांत्रिक उघडझांप !

" आक्का, काय ग केलंस हें—आक्का—"

" मंगल—"

आणि मिनी धावत जाऊन बाप्पांना बिलगली.

" बाप्पा—बाप्पा आक्काचे डोळे—"

मिनी स्फुंदून स्फुंदून रडत होती. बाप्पांच्या अश्रूंचा मिनीच्या मस्तकावर अभिषेक होत होता.

आणि मंगल ? ती अगदीं अचल होती !

बाहेर वादळाचं तांडव नृत्य हळूहळू शात होऊं पहात होतं. निसर्गानें आपलं नित्याचं शांत स्वरूप धारण करायला सुरुवात केली होती. त्याचा खेळ संपला होता—पण—?

# २२

सारं कांहीं शांत झालं होतं. नित्याचे व्यवहार सुरळीत चालू होते.

बागेंत फुलांना बहर आला होता. मंगलचा लाडका किशोर गात होता. मंगलला हाका मारीत होता.

आणि मंगल ?

मध्यंतरी जणू कांहीं घडलंच नाहीं पहिल्या पासनं हें असंच चालू आहे—

अशाच तऱ्हेनं ती घरांत वावरत होती. नाहीं म्हणायला तिच्या डोळ्या-भोंवतालचीं तीं काळीं वर्तुळं आतां अधिकच मोठीं अन् दाट झालीं होतीं. हातांतून वरचेवर गळून पडणाऱ्या सोन्याच्या बांगड्या आतां तिनें कायम-च्याच काढून टाकल्या.

त्या दृष्टीहीन नेत्रांत कसलेच भाव दिसत नव्हते. फक्त यांत्रिक उघडझांप !

बाप्पा, जगूकाका, मिनी—कोणीच कोणाशीं विशेष बोलत नव्हतं.

आजकाल बाप्पा खूपच म्हातारे दिसूं लागले होते.

आणि मिनी—आक्काच्या इच्छेसाठीं म्हणून तिनें पुन्हा कॉलेजमध्यें जाण्यास सुरवात केली होती. खालीं मान घालून लेक्चर्स ऐकत होती.

तिच्या मुखावरचं तें प्रसन्न खेळकर हास्य त्या वादळानंतर कधींच कोणी पाहिलं नाहीं.

पहिल्या प्रणयाचा तो बेफाम उन्माद आतां पार ओसरला होता, समुद्रा-च्याहि भव्यतेला लाजविणारं तिच्या आक्काचं उदार हृदय—आक्काच्या त्यागाच्या त्या प्रशान्त ज्योतीकडे पहातां पहातांच हसरी, नाचरी अल्लड

मीना कमालीची शांत झाली होती. त्या ज्योतीच्या शांत प्रकाशांत मीनीच्या अवखळ आयुष्याला नकळत स्थैर्य आलं होतं.

त्या संध्याकाळीं मंगल अविनाश बरोबर बोलत बसली होती. ती पुन्हां पुन्हां अविनाशला कांहीं तरी सांगण्याचा—पटवून देण्याचा प्रयत्न करीत होती. अविनाशला मात्र तें अजूनहि पटल्यासारखं दिसत नव्हतं.

त्याचा प्रत्येक शब्द असाह्यतेतून निघत होता—

" कसं सांगूं तुम्हाला मंगल—शक्य नाहीं तें. "

" त्यांत अशक्य असं कांहीं नाहीं अविनाश. मलाहि कांहीं दिवसांपूर्वी असंच वाटलं होतं—पण मनुष्य फक्त स्वतः पुरताच विचार करतो तेव्हांच..."

—जगूकाकांनीं जें मंगलला सांगितलं होतं तेंच आज मंगल अविनाशला सांगत होती.

" मंगला, तुम्हाला विसरणं—"

" मला विसरून जा असं सांगत नाहीं मीं तुम्हांला अविनाश. माझं फक्त एकच मागणं आहे. मंगलला मिनीच्या हृदयांत पहायला शिका त्यांतच तुमचं कल्याण आहे—माझ्या मिनीचा आनंद आहे. नाहीं म्हणूं नका अविनाश —"

बराच वेळ दोघंहि स्तब्ध राहिलीं. आणि ती शांतता असह्य झाली म्हणूनच कीं काय मंगल उठली. नित्याच्या संवयीनं रेडियोजवळ जावून बटन दाबलं.

कुठच्या तरी नवीनच नायीकेचा तो नितान्त मधूर आवाज आणि ते शब्द—

' बघावें कां तुला वाटे—नसेही—' मंगलच्या तोंडून एक बारीक किंकाळी बाहेर फुटली.

अविनाशनं चमकून वर पाहिलं—मंगलचा देह थरथर कांपत होता. अविनाशनं वेळींच पुढं होऊन तिला सावरलं नसतं तर ती केव्हांच खालीं कोसळली असती.

" अविनाश, लवकर—लवकर चला—"

" कुठं ? कुठं जायचंय तुम्हांला—"

" लवकर—लवकर—अगदीं लवकर चला अविनाश—"

# २३

" लवकर—लवकर चला विराग भय्या. आत्तां गाणं सुरूं होईल. "

" विरागभय्या, माझं गाणं ऐकायला चुकूं नका हं—"

—मुंबईला जातांना सुलोचनेनं अगदीं बजावून सांगितलं होतं विरागला. आणि त्यानंहि गाणं ऐकण्याचं अभिवचन दिलं होतं तिला. पण आज मात्र गाणं सुरूं व्हायला अवघीं पांच मिनीटं उरलीं तरी विराग कॉटवर पडून होता. प्रत्येक गोष्टीला सीमा आहे. इच्छाशक्तिच्या जोरावर शारीरिक दुर्बलता बाजूला सारून सतत काम करीत राहाणारा विराग—पण पोखरलं गेलेलं शरीर किती दिवस तग धरणार ?

एक क्षणहि विश्रांती न घेणारा विराग आजकाल वेळीं अवेळींहि कॉटवर पडलेला दिसूं लागला. आजहि तो तसाच पडून होता. पण छोट्या आनंदाला त्याप्रसंगीं आपल्या विराग भय्याची आठवण झाल्याखेरीज कशी राहील ?

विरागचा हात पकडून त्याला आश्रमाच्या मुख्य दालनांत घेऊन जातांना आनंद बडबडत होता—

" भय्या, आज आपली सुलोचनाताई गाणार—खरंच भय्या तुम्ही कां नाहीं गेलांत तिच्याबरोबर मुंबईला ? मंगलादेवी भेटल्या असत्या तिथं तुम्हाला. "

विराग फक्त हंसला.

रेडियोंत गाणं सुरू होणार होतं सात वाजतां. पण सहा वाजल्यापासूनच आश्रमांतलीं सारीं मुलं रेडियोभोंवतीं जमलीं होतीं. एऱ्हवीं लहान मुलांचा कार्यक्रम किती उत्सुकतेनं ऐकत असत तीं सारीं. पण आज केव्हां एकदांचा तो कार्यक्रम संपतोय असं झालं होतं सर्वांना. आणि शेवटीं पडले एकदाचे साताचे ते स्वर तालबद्ध ठोके.

" यह बम्बई है. अब सुलोचना देवी एक मराठी भावगीत सुनायेंगी. "

सारीं मुलं ताठ बसलीं. विरागहि खुर्चींत किंचित पुढें ओणवून ऐकूं लागला.

आपण आंधळे आहोंत—सर्वांनाच स्वतःच्या अंधत्वाचं विस्मरण पडलं असावं. प्रत्येकानें दुसऱ्याकडे मान वळवली. डोळ्यांची उगाचच उघडझांप झाली. प्रत्येकाच्या मुद्रेवर कमालीचं आश्चर्य दिसत होतं.

अरे, हें कुठलं गाणं गाते आहे सुलोचनाताई आज ? हें गाणं तर कधींच शिकवलं नाहीं विराग भय्यानं—

विरागनं दोन्हीं हातानं मस्तक घट्ट धरलं. सुलोचनेच्या गाण्यांतला प्रत्येक शब्द त्याच्या हृदयावर घणाचे घाव घालीत होता—

' बघावें का तुला वाटे—
नसे ही भूक नेत्राची. '

त्याच्या डोळ्यापुढें रात्रीं चोरून गाणं ऐकणारी सुलोचना उभी राहिली. कुठल्या जन्मीचा दावा साधला होता हा सुलोचनेनं !

# २४

सुलोचनेचे हात हातांत घेऊन मंगल भराभर प्रश्न विचारीत होती. प्रश्नाचं उत्तर देण्याचा अवसरहि मंगल तिला देत नव्हती. आणि ह्या तिच्या प्रश्न विचारण्याच्या पद्धतीची गंमत वाटूनच कीं काय सुलोचेनेनं मध्येंच विचारलं—

" आपलं नांव कळेल मला ? "

" माझं नांव..." मंगल किंचित् घुटमळली आणि तेवढ्यांत पुढें होऊन रेडियोच्या चालकांनीं तिची ओळख करून दिली—

" ह्या मंगला देसाई—"

" कोण ? मंगला देवी—"

सुलोचनेनं मंगलचे हात जोरानें दाबले. हळूं हळूं त्या हाताची पकड सैल झाली. सुलोचनेच्या मुद्रेवर खिन्नता दिसूं लागली. " किती मी दुर्दैवी ! ह्या अशाच वेळीं स्वतःच्या आंधळेपणाचा मनस्वी..."

" म्हणजे तुम्ही पण आंधळ्या—"

मंगलचा ' पण ' सुलोचनेच्या लक्षांत आला नसावा—

" होय ताई. हे डोळे नुसते दिखाऊ डोळे आहेत. अनेकांना फसवितात ते. "

कितीतरी वेळ त्या दोघी तशाच बोलत राहिल्या आणि शेवटीं मंगलनं आग्रह करून सुलोचनेला घरीं आणलंच.

" मग जाऊं ना बाप्पा मी उद्यां सुलोचनाबरोबर ? माझी खात्री आहे बाप्पा. विराग म्हणजेच...मग...जाऊं ना बाप्पा मी तिच्या बरोबर ? "

नकार देणं बाप्पांना शक्य नव्हतं. ते आणि जगूकाकाहि तिच्याबरोबर निघाले. पण मंगलनं त्यांना येऊं दिलं नाहीं.

" चार दिवसांत परत येतें मी बाप्पा. आणि काका, बाप्पांना सोडून अगदीं हलूं नका हं. फक्त चारच दिवस ! "

मिनी—अविनाशलाहि मंगल हेंच सांगत होती. पण दोघानींही तिचं ऐकलं नाहीं.

नागपूर मेलनं भंडारा स्टेशन मागें टाकलं. गाडी थांबणाऱ्या प्रत्येक स्टेशनचं नांव सुलोचना विचारीत होती.

" आतां फक्त दोनच तास. "

" दोन तास ! " मंगल स्वतःशीच उद्गारली.

* * *

सुलोचनताईबरोबर अजून तीन पाहुणे आल्याची वर्दी विरागभय्यांना देण्यासाठीं आश्रमाचा रामा गडी पुढें धांवला.

दारांत येऊन विरागनं दूरवर दृष्टी टाकली. सुलोचना—तिच्या बरोबर गेलेले दामले मास्तर—मंगल ?—मीनी ? आणि—आणि हे कोण ? मंगलचा

दुसऱ्याच क्षणीं विराग दाराआड अदृश्य झाला.

आश्रमाचं सारं आवार शोधूनहि विरागचा पत्ता लागला नाहीं.

रामा गडी पुन्हा पुन्हा गुरुजींना सांगत होता—" यवढ्यांत इराग भय्या इथ व्हते—मीच नव्ह का पुढ व्होऊनश्यान पावणं आल्याची वरदी त्यास्नी दिली—"

सगळीकडे शोधलं—पण जें तिथं नव्हतं तें सांपडणार कोठून ?

" विराग—विरागभय्या—भय्या—"

पण सुलोचनेच्या हाकेला ' ओ ' मिळाली नाहीं.

त्याच वेळीं रामाला भेटायला आलेला त्याचा मेव्हणा सांगत होता—

" आत्तांच नव्हका मी तुमच्या इराग भय्यास्नी स्टेशनात जातांना पायलं—"

आणि मग थोडाहि वेळ न गमवतां नाना गुरुजी तात्काळ निघाले.

गाडी सुटायला अवघीं पांच मिनीटं उरलीं होतीं. खूप गर्दीच्या एका

तिसऱ्या वर्गाच्या डब्यांत शेवटीं गुरुजींना विराग सांपडला. त्याचा हात धरून गुरुजींनीं त्याला खालीं उतरवला. कांहीं एक न बोलतां विराग गुरुजींबरोबर निघाला.

वाळवीनं पोखरलेला प्रचंड वृक्ष थोड्याशा वाऱ्यानंहि उन्मळून पडतो.

केवढ्या आशेनं मंगल आली होती ! बिछान्यावर निपचित पडलेली मंगल अनेक वर्षांच्या आजाऱ्यासारखी दिसत होती.

क्षणाक्षणानं पुढें धावणारा घड्याळाचा कांटा मंगलचं जीवनसत्व शोषण करून पुढें जात होता.

विराग मंगलकडे पहात होता. तो क्षीण देह, तो काळवंडलेला चेहेरा—काय झालं होतं हें ?

त्याचं सारं अंतःकरण पिळवटून निघूं लागलं. आणि त्या अंतःकरणांतून शब्द उमटले—

" मंगल— "

तिच्या जिवाला गुंगवून टाकणारा तो आवाज—पण हा भास तर नव्हे ? हा असाच भास त्या पूर्वी अनेकदां नाहीं का झाला ? मग हा तरी...

" मंगल—मंगल— "

निपचीत पडलेली मंगल चटकन् उठून बसली. विराग पुढें झाला.

हाच तो स्पर्श ! तिच्या सुरेन्‌चा हात तिच्या हातांत होता.

पडत्या सुईचाहि आवाज होईल अशी ती असीम शांतता—

दोन हृदयांचीं आंदोलनं इतरांना ऐकूं जात नाहींत पण त्या हृदयाच्या संवेदना ज्याच्यासाठीं असतात त्या हृदयाला मात्र त्या जाणवल्याशिवाय रहात नाहींत.

" कुठें गेलां होतां सुरेन् मला एकटीला टाकून ? "

" काय सांगूं मंगल— "

" खरं तेंच सांगा. माझा कंटाळा— "

" तुझा—तुझा कंटाळा ? शक्य आहे का हें ? "

" मग ? माझ्या प्रेमाची परीक्षा— "

" तसं नाहीं ग—कसं—कसं सांगूं तुला—मंगल— "

त्या असीम शांततेचा भंग न करतांच तीं दोन मनं परस्पराशीं बोलत होतीं.

आणि तें मूक संगीत मंगल जीवाचे कान करून वर्षनूवर्ष ऐकत राहिली असती. पण आज ?

आतां तेवढा अवधी उरला नव्हता. साऱ्या प्रश्नांचीं न सांगतां—न विचारतां उत्तरं मिळालीं होतीं. पण त्या एका प्रश्नाचं उत्तर—तें मात्र अजूनहि सुरेननं दिलं नव्हतं.

आणि तें उत्तर मिळाल्याखेरीज साशंक मनानं पुढची वाट चालणं मंगलला शक्य नव्हतं. तेवढ्याचसाठीं तर ती त्याच्याकडे आली होती.

" सुरेन् सांगा ना—"

" काय सांगूं मंगल—"

" खरं तेंच सागा कां ? कां गेलांत तसे एकाएकी निघून ? खरं खरं सांगा—माझा कंटाळा—"

" मंगल. "

" मग सांगा ना कां गेलांत मला सोडून ? "

क्षणाक्षणानें मंगलची अस्वस्थता वाढत होती.

" नाहीं सुरेन्, माझ्या प्रश्नाचं उत्तर मिळाल्याखेरीज माझं मन शांत नाहीं होणार. लवकर लवकर सांगा—"

" मंगल—मंगल "—अडखळत सुरेन् बोलूं लागला.

" तुला तो दिवस आठवतो ? त्या दिवशीं मिनीनं तुला विचारलं—"

मंगलच्या चेहेऱ्यावर कमालीची आतुरता दिसूं लागली.

" काय विचारलं मिनीनं मला ? "

" तिनं तुला विचारलं—'सांग तर तुझा सुरेन कसा आहे' आणि—आणि तूं सांगीतलंस – तूं म्हणालीस—मंगल—मंगल—"

" काय सांगितलं मी तिला ? "

" तूं म्हणालीस जगांतली सुंदरता मंगलता म्हणजेच माझा सुरेन्. "

" मग ? खरं तेंच सांगितलं मी तिला. "

" नाहीं मंगल. तें खरं नव्हतं. आणि म्हणूनच मी तुझ्यापासून दूर निघून आलों. तुझ्या डोळ्याचं ऑपरेशन झालं. तुझ्या दृष्टीला पडण्याची मला भिती वाटूं लागली. मंगल, कसं सांगूं ? माझा हा सौंदर्यहीन कुरूप चेहेरा पाहून माझी मंगल—"

पण पुढें कांहींच सांगण्याची गरज उरली नव्हती.

पुन्हां थोडा वेळ तीच पहिली शांतता पसरली. मंगलनं खोल निःश्वास टाकला.

" सुरेन—"

" मंगल—"

" तुम्हीं कधीं देवमंदिरांत गेलां आहांत का ? "

सुरेननं उत्तर दिलं नाहीं.

" सुरेन् मी कांहींच सांगत नाहीं. सांगण्याची आतां आवश्यकताहि उरली नाहीं. पण माझ्यासाठीं एकदां पंढरपुरचा विठोबा पाहून या. काशी, रामेश्वरला जाऊन तेथील देवालयांत देवांच्या मूर्ति पहा आणि मग तेथें जमणाऱ्या असंख्य भक्तांच्या डोळ्यांत माझं उत्तर शोधा. "

" मंगल— "

" सुरेन्, सौंदर्य पहाणाऱ्याच्या डोळ्यांत असतं, मूर्तींत नसतं. प्रेममय दृष्टीला जगांत कुरूप कांहींच दिसत नाहीं. "

" डोळे असूनहि आंधळा होतों ग मी. आज डोळे उघडले. "

" अखेरीस कां होईना माझ्या प्रेमाची ओळख पटली तुम्हाला. थोडं कां समाधान आहे हें. "

" नाहीं—नाहीं. असं म्हणूं नकोस मंगल. ही अखेर नाहीं. ही सुरवात आहे. लवकरच बरी होईल माझी मंगल. "

मंगल खिन्नपणें हसली. त्या हास्यांतून एकच ध्वनी निघत होता—

' किती खुळे आहात सुरेन् ! शेवटाला सुरवात कशी म्हणायची ? हें असलं उलटं कालचक्र—'

" आतां ह्यापुढें तुला कध्धीं सोडून जाणार नाहीं मी. मंगल हंसु नकोस ग. विश्वास ठेव माझ्यावर. "

" तुमच्यावरचा माझा विश्वास अढळ आहे सुरेन्. पण—पण मीच आतां तुम्हाला सोडून दूर निघून जाणार. "

" मंगल भलतंच नको ना बोलूंस—"

" खरं तेंच सांगतें आहे मी तुम्हाला. मी बरी होईन, नक्कीच बरी होईन.

माणसाला जें हवं असतं तें सहजासहजीं कधीच मिळत नाहीं. आणि खरं सांगूं सुरेन ? मरणाची सुद्धां पूर्वीच्या उत्सुकतेनं वाट पहात नाहीं आतां मी."

मंगल क्षणभर थांबली. तिचा आवाज बराच खोल पण तितकाच स्पष्ट निघत होता—

"एक काळ असा होता कीं त्यावेळीं मला तुमची अत्यंत गरज होती. आयुष्याचा जोडीदार म्हणून तुमच्या सहवासासाठीं मी तळमळत होतें— पती म्हणून तुम्ही मला हवे होतां—"

"अजूनहि वेळ गेली नाहीं मंगल. अजूनहि आपले मनोरथ—"

"नाहीं सुरेन्. आतां ह्यापुढें संसार करण्याची मला इच्छा नाहीं आणि आतां माझ्यांत तेवढं त्राणहि उरलं नाहीं. प्रत्येक गोष्टीला सीमा असते. आशाच नाहींशी झाल्यावर निराशेच्या दुःखाची तीव्रता बऱ्याच अंशांत कमी होते. तुमची वाट पाहिली. सारा जीव डोळयांत आणून तुमच्या वाटेकडे डोळे लावून बसलें. पण काय मिळालं मला ? तुम्ही आलां नाहींत.

प्रणयाचा तो बेफाम उन्माद—कसा कोणास ठाऊक—पण हळुहळू ओसरला. डोळयांतलं पाणी आटलं. आणि मग स्वतःलाच न कळत मी माझ्या दुःखाचं मूळ शोधूं लागलें. हळूहळू ती हुरहूर, ती निराशा, ती तळमळ सारं कांहीं लय पावलं. माझी खात्री पटली—माझ्या प्रेमाचं स्वरूप पार पालटलं आहे. आणि मगच केवळ बाप्पा, मिनीला सुखी करण्यासाठीं मी लग्नाला तयार झालें. आणि त्याहि दिव्यांतून मी बचावलें. ज्या वेळीं तुम्ही मला हवे होतां त्या वेळीं मला दूर लोटून निघून गेलात. आतां जवळ आलांत पण आतां मला तुमची गरज उरली नाहीं सुरेन."

"पण मला तुझी गरज आहे मंगल. नाहीं मंगल आतां मी तुला दूर जाऊं देणार नाहीं. अजूनहि एकमेकांच्या सहवासांत आपण—"

"तो सहवासच आतां मला नको आहे. पती म्हणून तुमच्याकडे पहातांना मला त्या सहवासाची गरज होती. पण आज देव म्हणून तुमची पूजा करतांना तुमच्या सहवासाची गरज मला भासत नाहीं. इतकंच नव्हे तर तो सहवासच आतां माझ्या भक्तिच्या आड येईल."

"असं कां बरं म्हणतेस मंगल. आपलं प्रेम पवित्र आहे."

मंगल विषण्ण—मिस्कीलपणें हंसली.

" आणि हें कळत असूनही तुम्ही दूर पळून आलांत सुरेन्. आपलंच कां जगांतलं कुठचंही प्रेम कधींच अपवित्र नसतं. प्रीती, भक्ति आणि मुक्ती— मानवी मनाच्या विकासांच्या ह्या तीन पायऱ्या आहेत. प्रीतींतून भक्तिचा जन्म झाला. मनाला प्रीतीहून भक्तिकडे वळवतांना मनाची सारी शक्ति खर्चीं घालावी लागली मला. आणि आज मी मधल्या पायरीवर उभी आहे. जीवनाचं मोल देवून मिळवलेली ही पायरी ! तेथून खालीं येण्याची माझ्या मनाची तयारी नाहीं. आतां फक्त माझी दृष्टि त्या एकाच सिमेवर लागली आहे. ती सीमा ओलांडली कीं मग कायमची— "

# २५

मंगलला घेऊन गाडी निघाली.

किती तरी वेळ सुरेन् गाडी गेली त्या दिशेकडे पहात उभा होता.

मंगलच्या गाडीनें रूळ बदलला. गाडी दिसेनाशी झाली.

'आज मंगलला घेऊन गाडी दृष्टिआड झाली माझ्या आयुष्याची गाडी पण अशीच एक दिवस मला घेऊन निघून जाईल मावशीच्या प्रेमळ सहवासांतलं तें रम्य बालपण—त्या नतरचा तो उन्मादक तारुण्यकाल—मंगल—आश्रम—सुलोचना—माझ्या आयुष्याची गाडी ह्या प्रत्येक स्टेशनवर क्षणकाळ विसावली आहे. आतां ह्या पुढें कोठेंहि न थांबतां ती लवकर निघून जाईल तर—'

कशी कोणास ठाऊक पण सुरेन्‌ची ही इच्छा मात्र दैवानं फारसा विलंब न लावतां पुरी केली खरी.

प्रतिपदेला चंद्र आपली नाजुक चंद्रकोर जगाला दाखवीत होता आणि पहाता पहातां पौर्णिमेला सारं वैभव प्रकट करून अमावस्येला......

पण अश्वीनांतल्या त्या वैभवशाली पौर्णिमेच्या मध्यरात्रीं अविनाश आपल्या रोजनिशींत लिहीत होते—

आज मंगलनं ह्या जगाचा अखेरचा निरोप घेतला! तिच्या चेहेऱ्यावरचं ते शान्तीचं, समाधानाचं तेज अखेरपर्यंत ढळलं नाहीं. खरंच किती उदात्त, पवित्र .....

आणि त्यानंतर थोड्याच आठवड्यांनीं अविनाशनी नव्या वर्षाच्या नव्या पानाची सुरवात केली—

आजच तार आली, काल सुरेन् ह्या जगांतून निघून गेला. सुटला बिचारा! दुष्ट माणसापेक्षां दुबळ्या लोकांच्या हातूनच अनर्थ जास्त ओढवतात असं म्हणतात तें खोटं नाहीं. केवळ मनाच्या दुबळेपणामुळं..."

थोड्याशाच अंतरानं दोन्ही गाड्या सीमेपलिकडे विरामस्थळीं जाऊन पोंचल्या.

## २६

आश्रमांतलीं मुलं खेळत होतीं. आपल्या आवडत्या बकुळीच्या झाडा-खालीं बसून सुलोचना हार गुंफीत होती.

प्रार्थनेची घंटा झाली. मुलं भराभर निघून गेलीं. सुलोचनाही जागची उठली.

सारं कांहीं जिथल्या तिथं होतं—भक्त विराग भय्याच्या जागेवर फुलांचा छोटासा ढीग दिसत होता. सुलोचनेनं हातांतली माळ त्या फुलांना वाहिली.

शांत गंभीर आवाजांत प्रार्थना सुरू झाली.

आपल्या आक्काच्या छाया चित्राकडे पाणावलेल्या नजरेनं पहात मीना उभी होती. अविनाशनं तिच्या हातांतून ती माला घेतली—मंगलच्या छाया चित्राला वाहिली.

दोघांनींही हात जोडले.

पिंजऱ्यांत किशोरचं हांकामारणं चालूच होतं—

" मंगल—मंगल—मं—मंगल—"